|| SHRI GANESHAY NAMAH ||

LAGNA PAHAVA KARUN | DIALOUEGS 6.0

WRITTEN BY KSHITIJ PATWARDHAN AND SAMEER VIDWANS

**मुख्य कॅरेक्टर्सः**

निशांत बर्वेः वय २९ । अमेरिकेवरुन लग्न करण्यासाठी आलेला पुण्यातला सॉफ्टवेअर इंजीनिअर

मधुरा गोडबोलेः वय २५ । अमेरिकेतल्या मुलाशी लग्न करण्यासाठी इच्छुक असलेली पुण्यातली मुलगी

आदीती टिळकः वय ३१ । पुण्यातील एका हाय प्रोफाईल मॅरेज ब्युरोमध्ये मॅरेज कन्सल्टंट

विठ्ठल पवारः वय २४ । पुण्यातील एका कॉफी शॉप मधला वेटर

प्रफुल्ल पटेलः वय २३ । पोपट पटेल या बिझनेसमनचा सगळयात छोटा मुलगा

पूर्वा गायकवाडः वय २२ । प्रफुल्लची गर्लफ्रेंड

नलू ताई दिक्षितः वय ६० । पुण्यातील सर्वात प्रसिध्द ज्योतिषी । लग्न जमवण्यात हातखंडा

राहुल कुलकर्णीः वय २६ । प्रायव्हेट बँकेत काम करणारा मध्यमवर्गीय मुलगा

आनंदी माडगूळकरः वय २६ । ट्रॅव्हल कंपनीत काम करणारी कन्सल्टंट

महादेवशास्त्री टिळकः वय ७२ । आदीतीचे आजोबा आणि खूप मोठे ज्योतिषी

**1. INT/ DAY/ NISHANT HOME / NISHANT ROOM + HALL**

कलर पॅलेट वर काळया रंगात ब्रश बुडवला जातो. पाठीमागे काही पेंटींग्ज पोस्टर्स दिसतायत. ब्रशने कॅनव्हास वर ‘शुभविवाह’ असं लिहीलं जातं. लिहून त्याकडे पहाताना निशांत दिसतो. पांढरा स्वच्छ कुरता घातलेला. आई हाक मारते.

**निशांत**

ऐ आई! ऐक ना, मी नाही येत लग्नाला. बोर झालंय!

**आई (व्ही ओ.)**

घ्या! पंधरा दिवसांनंतर आपलं आहे, त्यालाही लोकं असचं म्हणतील!

**निशांत**

(मिष्कीलपणे हसत)

बरं आहे ना, जेवणाचा खर्च वाचेल!

(आई तणतणत आत येते.)

**आई**

तुमचं बरं आहे हो, बायकोला घेऊन तुम्ही जाणार अमेरिकेला! नंतर सगळयांना आम्हाला तोंड दयायचंय. लाडू चिवडयाचा पुडीत एका लाडवाला मनुका नव्हता म्हणून सुध्दा फोन करुन सांगतात नातेवाईक. असो. चल मी निघते. संध्याकाळी नलू ताईंकडे जायचंय हां.

**निशांत**

संध्याकाळी मी वैशालीत चाललोय.

**आई**

ते डोसे आणि इडल्या नंतर गिळ! आधी भिशी मग नलू ताई.

**निशांत**

भिशी?

**आई**

चार ला येतायत सगळया बायका तुला बघायला.  एखादं गाणं बिणं म्हणायला सांगीतलं तर म्हणं! भाव नको खाऊ. रमणबागेत तुला भावगीत गायनाची बक्षीसं मिळालीयेत सगळयांना माहीतेय.

**निशांत**

आई जा आता!

**आई**

नलू ताई बाकी ग्रेट! त्यांनी सांगीतलेल्या दिवशी, सांगीतलेल्या वेळेला, लग्न होतंय! नाकं मुरडत होतात ना पत्रिकेला?? घ्या, पत्रिका पाहिल्या पाहिल्या म्हणाल्या, मुलगी बघायचीही गरज नाही. हिच्याशीच लग्न होणार!

**निशांत**

मग आता काय करायचं? त्यांना भारतरत्न दयायचं का?

**आई**

एवढे काही टोमणे मारायची गरज नाही.

(घडयाळात बघते.)

अगंबाई, निघते मी.  भिशी आणि ताई लक्षात ठेव!!

(आई वळते. निशांत हसतो. तिला ढकलत बाहेर आणतो.बाहेरच्या खोलीत आणलंय. टीव्ही चालू आहे.  आई वळते.)

**आई**

बरं ऐक! फ्रीजमध्ये डोशाचं पीठ ठेवलंय, ते बघ! चुकून श्रीखंड म्हणून खाशील. आणि पोळया घेतल्यास की डब्याला झाकण लावून ठेव! नाहीतर पापड होतील फॅनखाली! येऊ का?

(आई निघून जाते.)

(निशांत दार लावतो. समोर टीव्ही चालू आहे त्याकडे पहातो. टीव्हीवर एक बाई चंदेरी साडी घालून, कपाळावर आंब्याच्या कोयीएवढी टिकली लावून बसली आहे. मागे भविष्याचा लोगो आहे.)

**बाई**

नमस्कार! मी सारंगी कोकीळ!  ब्रेक नंतर आपलं स्वागत आहे. आता बघूया सिंह राशीचं भविष्य. अतिशय चांगला दिवस आहे. तुमच्या दुधात आज कोणीतरी गुपचूप साखर घालणार आहे.

(निशांत प्रश्नार्थक हसतो.)

चांगल्या घटना आणखीन चांगल्या होणार आहेत. सोन्यात गुंतवणुक करा आणि सोन्यासारख्या माणसांतही. आजचा दिवस तुमचा आहे.

(निशांतचा फोन वाजतो. तो फोन उचलतो. )

**निशांत**

येस! नो आय डिडन्ट चेक इट! टेल मी...

(थांबून)

व्हॉट?

(डोक्याला हात लावतो.)

ओ शीट!

मोबाईल फेकतो. टीव्ही कडे पहातो. रिमोट घेतो. टीव्ही झपकन बंद होतो.

**CUT TO...**

~~**2. INT/ DAY/ NISHANT HOME / HALL**~~

**3. EXT/ DAY/ NISHANT HOME / NISHANT HOME EXT**

निशांत गाडी उघडतो. आत जाऊन बसतो. गाडी निघते.

**CUT TO...**

**4.INT/DAY/CAFÉ**

(कॅफे EXT दिसत. निशांत कॅफेत एका कोपऱ्यात बसलेला आहे. त्याचा मेसेज टोन वाजतो. तो बघतो. त्यावर आलेलं आहे. To know more about your future dial *141# and talk to our astro expert तो मेसेज डिलीट करतो. उठतो. इकडे तिकडे पहातो. बसणार तेवढयात एक मुलगी त्याच्या समोर चष्मा पुसत पुसत येऊन बसते. ही आदीती.

दोघे एकमेकांकडे पहातात. आदीती खुणेनं सांगते की ती इथे बसली होती. त्याला काहीच कळत नाही.)

**आदीती**

सॉरी मी इथं बसले होते.

(थांबून)

ही माझी बॅग!

(वर उचलून दाखवते. निशांत उठतो.)

**आदीती**

बसा बसा मी निघतेच आहे.

(तेवढयात राप्पकन पाठीवर रटटे मारल्याचा आवाज येतो. सगळे तिकडे बघतात. एक मुलगी उभी आहे. आणि एक मुलगा केविलवाणा बसलाय.)

**पूर्वा**

शटअप! ब्रुस चं प्रोफाईल केलं मी फेसबुकवर आणि तुला फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली. आज दोन दिवस झाले तू एक्सेप्ट करत नाहीयेस! मला कळलंय तुला ब्रुस आवडत नाही ! यूसलेस!!

(प्रफुल्ल तिला गोडीत समजवायला लागतो. ती ऐकतेय.)

**वेटर १**

भावडया हा ब्रुस कोण आहे?

**विठ्ठल**

हिचा कुत्रा! मागे एकदा घ्यून आली होती, टेबलावरचं मुतलं होतं त्ये!

**आदीती**

अकरावी बारावी! फिक्स!

(दोघे हसतात.)

**निशांत**

मी निशांत बर्वे!

**आदीती**

मी आदीती टिळक. लोकमान्य टिळकांची कुणीही नाही. सगळे पहिला प्रश्न हाच विचारतात कारण!

(तो हसतो. दोघं शेकहॅंड करतात.)

**आदीती**

एंगेजमेंट रिंग? काँग्रॅट्स!

(हात बाजूला करतात . मागे मधुरा उभी आहे. त्याच्याकडे पहाते. निशांत तिच्याकडे पहातो.)

**CUT TO...**

**5.INT/DAY/CAFÉ**

(मधुरा तिच्याकडील छोट्याश्या आरश्यात बघून लिपस्टिक लावतेय. निशांत तिचा हा कार्यक्रम संपण्याची वाट बघून सरळ बोलायला सुरुवात करतो. तरीही मधुरा तिच्यामध्येच रमलेली आहे. )

**निशांत**

मधुरा, ऑफीसमधून मेल आली होती. आज सकाळी फोनही आला होता. आय हॅव लॉस्ट माय जॉब.

(मधुरा हडबडून लिपस्टिक लावण थांबवून निशांतकडे प्रश्नार्थक पहाते.)

**मधुरा**

हं!

**निशांत**

पण होईल काहीतरी वर्कआउट!

**मधुरा**

(चमच्याने कॉफी ढवळतेय. ते थांबवत.)

समजा नाही झालं तर?

**निशांत**

नाहीच झालं तर आपल्या इथे बघीन ना!

**मधुरा**

(शांत बसते. मधूनच)

निशांत, तुझं वर्कआउट होईपर्यंत थांबूयात!

**निशांत**

काय?

**मधुरा**

थांबूयात. वर्कआऊट झालं, ठरलं तिकडे जायचं की करु!

**निशांत**

म्हणजे? मला नाही कळल.

**मधुरा**

मला तू आवडतोस वगैरे हे सगळं आलच रे, पण इमोशनल होण्यात पॉईंट नाही. मला लग्न करुन यू एस ला जायचंय. इथल्या फालतू आणि मिडीऑकर लोकांमध्ये मला रहायचं नाहीये. आय वॉन्ट टू लिव्ह फ्री ॲण्ड इंडीपेंडट लाईफ यू नो!

**निशांत**

आय नो! बर्फात मिनीज घालून फिरण्याला फ्री आणि घरात बसून नवऱ्याच्या पैशावर ऐंजोय करण्याला इंडीपेंडट म्हणणार असशील तर येस, ते तुला इथे नाही मिळणार!

(कुत्सितपणे)

हं!

**मधुरा**

हो ठीक आहे ना! म्हणूनच म्हणलं विचार करु! आणि मला माहीत नव्हतं ना रे, तुझं हे असं डळमळीत असणारे, नाहीतर मग...

**निशांत**

(डोळे मिटून विचार करतोय, अचानक)

विचार कशाला? आपण कॅन्सल करुयात.

**मधुरा**

काय?

**निशांत**

कॅन्सल करुयात! तसंही लग्न ठरल्यापासून तसंही तुला होणाऱ्या नवऱ्यात कमी आणि यू एस मध्ये जास्त इंटरेस्ट आहे. अमेरिकेत आपल्याइथल्या अशा टिपीकल मुली खूप पाहील्यात मी. तू तशी नसशील असं वाटलं होतं. बरं झालं आपण भेटलो, नाहीतर नंतर त्रास झाला असता.

**मधुरा**

एवढं बोलायची गरज नाही! मी आले नव्हते तुझ्या मागे मागे

**निशांत**

ओ रिअली? त्या नलूताईंनी पत्रिका मॅच काय केली, तू पोचलीस तिकडे मनातल्या मनात. दुसऱ्या दिवशी फ्रेंड रिक्वेस्ट, मग स्काईप वर तासतास चॅट, मग दोन दोनदा रात्री भेटायची रिक्वेस्ट! 'माय वुड बी हबी' म्हणून माझे फोटो! नको मधुरा आपण थांबूया. आय एम नॉट इंटरेस्टेड एनीमोअर!

(थांबून)

तू कोणीतरी अमेरिकनच बघ!

**मधुरा**

(संतापून त्याच्याकडे पहाते.)

मी कोणाला बघायचं ते तू नको सांगूस!

(निघून जाते. निशांत तिच्याकडे पहात रहातो. विठ्ठल आणि त्याचा मित्र काऊंटर वरुन पहातायत.)

**विठ्ठल**

सतरा नंबरचं टेबलच पनवती आहे च्यायला. चाळीस एक लफडी तरी मोडली असतील. म्हणून आपण पिंकीला म्हणलं बाई, कॉफी प्यायची असलं दुसरीकडे भेटू. हितं नको, नाय का?

(निशांत मान खाली घालून बसलाय. समोर पहातो.)

**5A.EXT/DAY/PARKING**

(निशांत स्वतःच्याच तंद्रीत चालत चालत एका गाडीपाशी येतो. आदीती पलिकडे फोनवर बोलतेय. निशांत गाडीवर जोरात हात आपटतो. तीचं लक्ष जातं.)

**आदीती**

एनी प्रॉब्लेम?

**निशांत**

(समोर पहात)

इटस नन ऑफ युवर बिझनेस.

**आदीती**

ओके! फक्त ही गाडी माझी आहे.

(रिमोट ने गाडी उघडते.निशांत पहातो. तिथून निघून जातो.)

**CUT TO...**

**6.INT-EXT/ DAY/CAR**

गाडी उघडली जाते. निशांत आत शांतपणे बसलाय. गाडीला स्टार्टर मारतो. आणि उजवीकडचा इंडीकेटर देतो. तेवढयात त्याला आवाज येतात.

**6 A. INT/ DAY**

**आई मैत्रीण 1**

हॉटेल कॅलिफोर्निया नावाचं हॉटेल आहे का रे खरंच? का नुसतंच गाणं आहे? आपल्याइथं का नाही काढत? केवढी चांगली होटेलं आहेत, श्येयस आहे, निसर्ग आहे, गुडलक आहे!

**6 B. INT/ DAY**

**आई मैत्रीण 2**

मधुराचं नाव काय ठेवणार तिकडे ? मॅडी?

(हसण्याचा आवाज)

**6 C. INT/ DAY**

**आई मैत्रीण 3**

रुखवताचं घेऊन जाऊ नका हां तिकडे! ते कस्टमवाले फार बेक्कार! आमच्या कुसुमला एअपोर्टवर कुरडया तळायला लावल्या होत्या.

**6 D. INT/ DAY**

**आई मैत्रीण 4**

योगासनं शिका आणि तिथे क्लास सुरु करा! तिकडे फार क्रेझ आहे म्हणे!

**6 E. INT/ DAY**

**आई मैत्रीण 5**

बरं, ते जाऊ दे, म्हणून दाखवं की एखादं गाणं! ए निशांत! स्वरगंगेच्या काठावरती येतं का?

(सगळे आवाज मिक्स होतात.)

**SONG MONTAGE**

**7.EXT/DAY/CAR**

गाडी वेगवेगळया रस्त्यावरुन जाताना दिसते. डावीकडचा इंडीकेटर दिला जातो. गाडीतला गणपती दिसतो, आणि पुढचा रस्ता दिसतो. गाडीत गिअरच्या शेजारी पत्रिका दिसतात. गाडी बोगदयात शिरते. अंधारातून बाहेर येते. निशांत अत्यंत खिन्नपणे गाडी चालवताना दिसतो.

**8.EXT/DAY/TEKDI**

गाडी एका पठारावर येते. निशांत शांतपणे उतरतो. समोर दरी . आसपास कुणीही नाही. तसाच उभा राहीलाय!

**१**

साहेब, खोट सांगणार नाही, खरं सांगणार! भविष्य सांगणार!

(निशांत हात जोडतो.)

**१**

भोळे आहात, नुकसान करायला घाबरता, प्रामाणिक आहात आणि त्याचाच त्रास होतो.

**निशांत**

(जाऊन डायरेक्ट पाय धरतो)

पाया पडू का आता? नाही ऐकायचं.

‘काय विचित्र माणूस आहे’ अशी रिएक्शन देऊन तो माणूस निघून जातो.निशांत पुन्हा समोर उभा आहे. तसाच. शांत. स्तब्ध.

**CUT TO...**

**MONTAGE CONTINUE**

**9 : INT/ NIGHT:**

आई वडील समोर बसलेत. आई रडताना दिसते. निशांत तिला समजावतोय.

**9 A : DAY/INT-EXT:**

एका रजिस्टर मध्ये २९ तारखेवर फुली मारली जाते. निशांत सप्तपदी मंगल कार्यालयातून बाहेर येतो.

**9 B : DAY/INT:**

फेसबुकवर एनगेज्ड चं सिंगल केलं जातं.

**9 C : DAY/INT:**

शुभविवाह लिहीलेला कॅनव्हास तो ढकलून देतो.

**9 D : DAY/INT:**

पेपरमधल्या भविष्याच्या पानाकडे पहातो. पान पलटतो, पुढचं वाचायला लागतो.

**9 E : NIGHT/INT:**

जॉबच्या वेबसाईटवर रेस्युमी अपडेट करतो. लोकेशन यूएस दिसतं.

**9 F : NIGHT/INT:**

निशांत झोपलाय. त्याच्या कपाळाला अंगारा लावला जातो. आई त्याच्या डोक्यावरुन हात फिरवते. निघायला लागते. कॅनव्हास पडलेला दिसतोय. त्यावर पांढर कापड टाकते.

**SONG END**

**10. DAY/INT/NISHANT HOME**

**आई**

(बाहेरुन)

एकदा चल म्हणले फक्त! एकदा! आणि तुझ्याचं लग्नासाठी चाललंय ना? का मला लग्न करायचंय परत? आठ दिवसापूर्वीच अपॉईंटेमेंट घेउन ठेवलीये. चल, मी तुझ्या पाया पडते.

(काहीच उत्तर येत नाही. निशांत दिसतो अचानक हमसून रडल्याचा आवाज येतो. तो पहातो. दार उघडतो.)

**निशांत**

माझा इंटरेस्ट संपलाय या पत्रिका आणि भविष्यातला. माझं चांगलं व्हायची अपेक्षा नाही मला, पण तुझं समाधान होणार असेल तर जाऊ आपण परत!

**CUT TO...**

**11 EXT/DAY/ NALU MAVSHI PALACE**

परमपूज्य नलूताई दिक्षीत भाग्यसंकेत अशी पाटी दिसते. निशांतची गाडी आत येते.

**CUT TO...**

**11 A.INT/DAY/ NALU MAVSHI PALACE**

(आत सर्वत्र त्यांचे आणि वेगवेगळया देवांचे फोटो लावलेत. घडयाळात चार वाजलेत. एक मुलगी काऊंटरपाशी बसलेली आहे. फोनवर पुढच्या अपॉंइटमेंट घेतीये. आई पैसे मोजून पाच हजार रुपये देतीये. निशांत ते पहातो वैतागतो, समोर पहातो. एक मासिक उचलतो. त्यावर नलिनी महात्म्य असं लिहीलं आहे. त्याच्याकडे पाहून कुत्सितपणे हसतो. आई त्याला गप्प बसवते. तो ते ठेऊन दुसरं उचलतो. त्यावर भाग्यरेखा असं लिहीलं आहे. ते ही ठेवतो.)

**निशांत**

फिल्मफेअर वगैरे आहे का?

**CUT TO...**

**11 B.EXT/DAY/ NALU MAVSHI PALACE**

(नलू ताईंची गाडी आत येते. त्या उतरुन नमस्कार करतात त्यावेळी सर्व भक्त नलूताईना नमस्कार करतात हे सर्व पाहून निशांत वैतागतो.)

**TRANSITION…**

**11 C. INT / DAY / NALUTAI PALCE**

घडयाळात पाच वाजलेले दिसतात. निशांत वैतागलेला दिसतो. तेवढयात एक मुलगी येऊन त्याला आत जायला सांगते. तो वैतागून उठतो.

**CUT TO…**

**12.INT/DAY/ NALU MAVSHI ROOM**

एक जाडजूड दार उघडलं जातं. भक्तीरसात न्हायलेलं संगीत वाजतंय. समोर सिंहासन वजा खुर्चीवर नलू ताई बसलेल्या आहेत. टेबलवर विविध वस्तू. रत्न. खडे. फेंगशुईतला हॅप्पी मॅन. दोन फोन वगैरे वगैरे.

**ताई**

बोला. काय लग्न मोडलं ना यानी?

**आई**

(चमकून)

हां म्हणजे, त्या संदर्भातच तुमचं मार्गदर्शन हवं होतं.

**ताई**

मुलाला बाहेर थांबायला सांगा. निगेटिव्ह व्हाईब्स येतायत. लगेच जाणवतं मला.

**आई**

लग्नाचं सगळं तुम्ही सांगूनही ते मोडलं म्हणून त्याला त्रास झालाय. नाहीतर तुमचं भविष्य कधीच खोटं ठरत नाही ना.

**ताई**

(रोखून पहात)

आता हाच त्या मुलीला नाही म्हणला असेल तर काय उपयोग मी भविष्य सांगून? काय रे?

(थांबून)

ठीक आहे! मी अभ्यास केलाय याच्या पत्रिकेचा, एक रत्न देते. उजव्या हातात बोटात घाला. बाहेर काऊंटरला पैसे दया. आठ दिवसात मिळेल. आणि दुसरी स्थळं ही सांगते.

(निशांत)

आता घाला ती अंगठी व्यवस्थित!

**निशांत**

त्यानी सगळं नीट होईल?

**ताई**

(थेट)

तुला काय वाटत मी गम्मत करतीये? शास्त्र आहे हे. अनुभव आहे माझा. पाच हजार लग्न, फक्त पत्रिकेच्या जोरावर लावलीयेत मी. आणि सगळे सुखानं नांदतायत. तुझ्या पत्रिकेत थोडा दोष आहे, त्याच्यासाठी एक शांतही करावी लागेल. नाहीतर त्रास होत राहील! बिनलग्नाचं राहयचं नाहीये किनई आपल्याला? आधी रत्न घाल, मग शांत करुया!

**निशांत**

तुम्ही शांत व्हा आधी!

**आई**

काय?

**निशांत**

हो, आणि होऊ दे त्रास मी बघीन!

**ताई**

बाळा, शांत हो तुझ्या समजण्यापलिकडे आहे हे!

**निशांत**

(आईला थांबवत)

सगळं समजतंय मला! लग्न जमवायचे दहा हजार, रत्न बित्न देणार त्याचे वीस एक होतील आणि शांत शांत म्हणून होमात वनस्पती तुप ओतणार त्याचे दहा पंधरा उकळणार. वेल डन!

**ताई**

आत्ताच्या आत्ता याला बाहेर काढा!

**निशांत**

काढा कशाला? मी चाललो. तुम्ही हयाच्या ऐवेजी पानाची टपरी टाका, म्हणजे ऑफीशीयली चुना लावता येईल लोकांना!

(त्याचा फोन वाजतो. तो घेतो.)

ओके, आय वील बी देअर!

(त्यांच्याकडे पहातो. दोघं  एकमेकांकडे रोखून पहातात. हा निघून जातो. त्या बसतात. पहात रहातात. )

**CUT TO…**

**13.INT/ DAY/CAFÉ**

थँक यू ची स्लाईड दिसते. आदीती आणि तिच्यासमोर फॉर्मल्समध्ये दोन लोकंबसलेली आहेत.

**आदीती**

(आश्वासक नजरेने)

कसं वाटलं सर?

**१**

यू हॅव गॉट अ गुड बिझनेस सेन्स पण यात पैसे गुंतवणं अवघड आहे! खूप एक्सप्लॉईटेड मार्केट आहे! तरी एकदा विचार करुन कळवतो.  निघू आम्ही? गेटींग लेट!

**आदीती**

थँक्स फॉर युअर टाईम.

(दोघे निघून जातात. ती खिन्नपणे निघायच्या तयारीत आहे. समोर निशांत येतो.)

**निशांत**

हाय! आदीती ना?

(आदीती शांत बसलीये.)

**निशांत**

एनी प्रॉब्लेम?

**आदीती**

येस! पण मी तुमच्यासारखं नन ऑफ युवर बिझनेस नाही म्हणणार!

**निशांत**

सॉरी मी त्या दिवशी तुझ्याशी आय मीन तुमच्याशी उध्दटपणे बोललो. ॲक्चुली मी अपसेट होतो. आत्ताही आहे.

**आदीती**

अरे व्वा! सेम पिंच. मी पण!

**निशांत**

का बरं?

**आदीती**

दोन वर्ष एका बिझनेस प्रपोझलवर काम करतेय! आत पंचवीसावा इन्व्हेस्टर तोंडावर नाही म्हणाला. एकच बरं आहे की सिल्व्हर ज्युबिली झाली!

(दोघे एकमेकांकडे बघून हसतात.)

**14. EXT/ DAY/STAIR**

**निशांत**

अ? डायटिशीअन?

**आदिती**

हा हा हा हा! काहीही!

(हसत)

मॅरेज काउन्सेलर! हाय प्रोफाईल लग्नाळू मुला मुलींच मॅचमेकींग आणि काऊन्सेलींग आणि करते मी बंधन नावाच्या मॅरेज ब्युरो मध्ये. तू?

**निशांत**

लग्नाळू!

(हसतो)

मी आत्तापर्यंत अमेरिकेतून आलेला लग्नाळू सॉफ्टवेअर डिझायनर होतो, आता सगळं गेलयं. उदयापासून काहीही करु शकतो. इस्त्री, हमाली, पेपरची लाईन, कल्हई, चटई पो झाडो!

**आदीती**

(थांबून)

लग्न मोडलं इतक्या सहज?

**निशांत**

जमलंच इतक्या सहज होतं की मोडलंही सहज! ॲक्चुली गेल्या काही दिवसात मला लक्षात आलय की आम्ही अब्रॉडहून आलेले नवरा कॅटेगरीतली पोरं किती मूर्ख असतो ना. पत्रिका बघून घरचे स्थळ ठरवतात. आम्ही ऑनलाईन बोलतो. पंधरा दिवस येतो आणि त्यात लग्न करुन बायकोला घेऊन जातो परत. केमिस्ट्री कम्पाटिबीलीटी शेअरिंग हयाचा विचारच करत नाही.

**आदीती**

माझ्याकडे पण आलेल्या मोस्ट ऑफद मुलांचं असंच असतं. हयांना ना बायको म्हणून प्रायव्हसीत कतरिना कैफआणि सोशल लाईफ मधे अलका कुबल हवी असते. पण बऱ्याच वेळेला मुलगी उलटीच असते. पत्रिका जुळल्या, क्रायटेरियात बसल्या की डायरेक्ट अक्षता!

**14 A. EXT/ DAY/PARKING**

(दोघं गाडीपाशी येतात. आदीती गाडीकडे पहाते. चाक पंक्चर झालेलं दिसतं.)

**निशांत**

आायडियली मी म्हणायला पाहीजे सोडू का! पण कुठे रहातेस तू?

**आदीती**

चिंचवड!

(निशांत प्रश्नार्थक)

पुण्यापेक्षा चांगले रस्ते आहेत!

**निशांत**

ते जगात कुठेही आहेत. मी सोडू का? गाडी राहू दे इथेच!

**आदीती**

थँक्स! मी जाईन बसने

**निशांत**

त्यापेक्षा चालत जा. सेमच वेळ लागेल.

(दोघे हसतात.)

**CUT TO…**

**15.EXT/ NIGHT/AADITI HOME**

गोष्ट खरी लई भारी ९एक्स झकास चा आवाज ऐकू येतो. गाडी बाहेर येऊन थांबते. दोघे आत जातात.

**15 A. INT/ NIGHT/AADITI HOME**

लाईट लागतात. फोटो दिसतात. निशांत समोर बसलाय. कॉफी पितोय. या सगळयावर आदीतीचा व्हॉईस ओव्हरलॅपः

**आदीती**

आमच्याकडे आजोबां पर्यंत सगळे ज्योतिषी आहेत. आजोबा त्यांचे वडील, त्यांचे वडील. मलाही थोडा सेन्स आहे. मी कॉफीच्या कपातल्या उरलेल्या कॉफीवरुन भविष्य सांगतात ते शिकतीये सध्या. काव्हे फल म्हणतात. तुर्कीश प्रकार आहे.

**निशांत**

माझा भविष्यावर विश्वास नाही.

**आदीती**

(आवरुन केस बांधून समोर येऊन बसते.)

मी सहज बघणार होते. गंमत म्हणून. सोड. तू गाडीत जे सगळं सांगीतलंस त्यावरुन काय वाटतंय सांगू? गट फीलींग?

**निशांत**

बोला लेडी नॉस्त्रेदेमस!

**आदीती**

तू बिझनेस सुरु करायला पाहीजेस. क्रिएटिव्ह डोकं आहे तुझं. आणि कॅपिटल पण आहे ना तुझ्याकडे?

**निशांत**

चांगलं आहे! आधी गाडी पंक्चर करायची. मग घरी बोलवायचं, मग भविष्य सांगायचं आणि मग स्वतःचं बिझनेस प्रपोझल सांगायचं.

(हसायला लागतो.)

यूएसवरुन आलोय म्हणून एवढं नाही कापायचं! आँ?

**आदीती**

अरे काय निरलज्ज आहेस तू! त्याचा काही संबंध नाही, ॲक्चुली, मला स्वतःची मॅट्रीमोनियल कंपनी काढायचीये. एक नवं कोरं आगळं वेगळं वधू वर सुचकमंडळ!

**निशांत**

मी नक्की येईन उदघाटनाला! माझा उदया इंटरव्यूचा फायनल राऊंड आहे. वैताग आलाय घरी बसून. चला मी निघतो, नाहीतर आईला वाटेल पोरगं नोकरी गेल्याच्या दुःखात प्यायला बसलं.

**15 B. EXT/ NIGHT/AADITI HOME**

**आदीती**

निशांत, तुझ्या माझ्यासारख्या मुला मुलींना खूप गरजेचं असलेलं, लग्नाबददल डोळसपणे विचार करायला लावणारं आणि सक्सेसफुल लग्न घडवणारं वधू वर सूचक मंडळ काढणार आहे मी. नाव आहे 'शुभ विवाह'!

(निशांत तिथून हसून निघून जातो. आदीती पहात रहाते. आजोबा दरवाज्याच्या इथे येवून तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत राहतात.)

**CUT TO...**

**16. INT/ DAY/ OFFICE**

एक माणूस निशांतला शेकहँड करतो.

आय एम युवर बॉस. युवर लाईफ बिलाँग्ज टू मी .

(हसायला लागतो.)

ऑफर लेटर आणि बाकीची डॉक्युमेंटस पंधरा मिनिटात मिळतील. वेट हिअर.

तो बसतो. समोर लांबच्या लांब फ्लोअर दिसतो.

निशांत बसलाय, आवाज ऐकू येतो.

**१:** निशांत, आज रात्री ऑफीस मध्येच थांब! आणि डेडलाईन बघ जरा!

**२:** निशांत सर, उदया परवा मी नाहीये. काय करायचं ते करा. आय वॉन्ट लीव्ह!

**३:** सॉरी तुला यूएस ला जाता येणार नाहीये. प्रोजेक्ट पोस्टपोन झालंय!

**४:** दोन दिवस घरीच गेला नाहीस तुझी बायकोच आज ऑफीसमध्ये आलीये.

समोर पहातो. त्याला आदीतीचा आवाज ऐकू येतो

**आदीती**

अॅक्चुली, मला स्वतःची मॅट्रीमोनियल कंपनी काढायचीये. एक नवं कोरं आगळं वेगळं वधू वर सुचक मंडळ!

तो हडबडतो. तसाच समोर पहात रहातो. डोळे बंद करतो.

**CUT TO...**

**17. INT/ DAY/ OFFICE**

ऑफर लेटर घेऊन एक माणूस येतो. समोर पहातो. कॉरीडॉर मध्ये कोणी नाहीये. तो प्रश्नात पडतो.

**CUT TO...**

**18. INT/ DAY/ STAIRS**

निशांत जिन्यावरुन खाली येतोय. फोनवर बोलतोय.

**निशांत**

आदीती ताबडतोब कॅफेवर ये! इन्व्हेस्टर मिळालाय!

**CUT TO...**

**19. INT/ DAY/ CAFÉ**

आदीती बसलेली आहे. समोर निशांत.

**आदिती**

खरंच तू इंटरेस्टेड आहेस?

**निशांत**

होतो! म्हणजे हे पाहील्यावर मी जरा कन्फ्यूज्ड झालोय. कोण ऐकणार हे सगळं?

**आदीती**

ऐकतील. ज्यांना रिलेशनशिप टिकवायचीय ते नक्की ऐकतील!

(समोरुन जोरात आवाज येतो)

**पूर्वा**

गोटू हेल! मला नाही टिकवायची रिलेशनशिप!

**आदीती**

(हसत)

अरे! अकरावी बारावी!

**निशांत**

आदीती, हयांना कनव्हिन्स करुन दाखव. तर मानलं. आत्ता हे दोघं भांडण सोडून एकत्र आले तर आपलं काम सुरु!

**आदीती**

(आश्चर्याने)

आर यू सिरीयस?

**निशांत**

ती निघाली! बघ!

(मुलगी निघते. मुलगा तिच्या मागे जातो. ती त्याच्या कानाखाली मारते. आदीती जीभ चावते. दोघांच्या समोर जाते.)

**आदीती**

एक्सक्युज मी. मला तुमच्याशी बोलायचंय.

**पूर्वा**

कोण तुम्ही? आम्हाला शँम्पू कंडीशनर वगैरे नकोय!

(निशांत हसायला लागतो.)

**आदीती**

मी काऊन्सेलर आहे! मी रोज तुम्हाला इथं बघते. तुम्ही कॅफेत येता. वचावचा भांडता. एकमेकांना मारता. तुम्ही रिलेशनशिप मध्ये आहात?

**प्रफुल्ल**

ऐ! तू कोण आहे गं? तुला काय करायचयं?

**आदीती**

मला काहीच नाही करायचंय जे काय करायचंय ते तुम्हाला! तसंही तुम्ही काय करणार म्हणा! दोन चार महिन्यापुरतं घरी कोणी नसताना एकमेकांना बोलवून चुम्माचाटी करणारे वाटता तुम्ही चेहऱ्यावरनं तरी.

**पूर्वा**

व्हॉट चुम्माचाटी? जरा मॅनर्सने बोला!

**आदीती**

मी? रोज कोपऱ्यातलं टेबल पकडता आणि सुरु होता. बाहेर पब्लिक रोज तुमचा हालता देखावा एंजॉय करतं. एखादयानं एमएमएसही केला असेल तुमचा! मग तुम्ही चारचौघात मारता एकमेकांना! आणि तू मला सांगतेस मॅनर्सबददल! आधी ना कपडे, भाषा आणि हावभाव यावर कंट्रोल ठेवायचं बघा! स्वतःच्या रिलेशनशिपबददल एक टक्का जरी रिस्पेक्ट आणि डिग्नीटी असेल ना तर मी तिथेच बसलीये तिथे या. आणि हो चुकूनही लग्न बिग्न करु नका एकमेकांशी. कारण खऱ्या प्रेमात एकमेकांचा त्रास घ्यायचा असतो. दयायचा नसतो.

(दोघे शांत.)

**विठ्ठल**

हेच, हेच सांगत असतो मी पिंकीला! पर फेक्ट रे!

**आदीती**

(थोडी जवळ जाते)

आणि हो! तुम्हाला कंडीशरचीच गरज आहे. इमोशनल कंडीशनरची. जो तुमच्या मनात एकमेंकाबददल सॉफ्टनेस आणेल आणि तेवढचं तुमचं रिलेशन आतून मजबूत करेल. तुमचा घरचा, पैशाचा, प्रेशरचा कसलाही प्रॉब्लेम असेल, या वयात हे असं होऊ शकतं. मी एक काऊन्सेलर पेक्षा एक मैत्रीण म्हणून सांगतेय.

(खांदयावर हात ठेवते.)

येता आमच्यासोबत कॉफी प्यायला?

(दोघे एकमेकांकडे पहातात. मान खाली घालतात.)

**CUT TO…**

**19A. INT/ DAY/ CAFÉ**

(काही कपांमध्ये कॉफी ओतली जातेय. चौधै हसतायत. विठ्ठल कॉफी आणून देतो)

**निशांत**

एक्सक्युज मी आम्ही कॉफी नव्हती मागितली.

**विठ्ठल**

एक्सक्युज मी! प्या सर! आज दोन वर्षात पहिल्यांदा या दोघांना एकत्र हसताना पाहीलंय. आपल्याकडनं फ्री आहे.

(सगळे परत हसतात. विठ्ठल निघून जातो.)

**प्रफुल्ल**

तुम्ही काय करता?

**निशांत**

आम्ही एक बिझनेस सुरु करतोय. मॅनपॉवर शोधतोय.

**प्रफुल्ल**

मी तसाही निठठला आहे. पप्पा रोज मागे लागतात कायतरी कर. त्यांना बिझनेस करतो असं सांगितलं तर शर्ट काढून पळत सुटतील. हा हा हा! आपण भेटू त्यांना ते आपल्याला गाईड करतील.

**आदीती**

नाही यातलं तुझ्या पप्पांना काही कळणार नाही!

**प्रफुल्ल**

गुजराती माणसाला कळणार नाही असा कुठलाच धंदा अजून बनला नाहीये!  उदया दुपारी आमच्या ऑफीसवर पप्पांना भेटू! ही इज अॅन आयडॉल! लिव्हींग लेजेंड इन हिस बिझनेस! ही इज पोपटलाल पटेल...ऑफ पटेल सन्स!

**CUT TO...**

**20. INT/ DAY/POPATLAL OFFICE**

(एक माणूस बसलाय. समोर खूप पदार्थ ठेवलेत. तो खातोय. मधूनच विचार करतो. )

**पोपट**

पुण्यात मॅरेज ब्युरो काढणं म्हणजी भाजी मंडईच्या बाहेरचं भाजीची गाडी टाकण्यासारखं आहे. काय वेगळं नाही याच्यात. सगळे हेच करतात. घ्या...

**निशांत**

नको.

**पोपट**

खा हो! काम होतं रहाते, खाणं आधी. कसं आहे मेडम, लग्न झालं की तुमचा रोल संपला ना! त्यापेक्षा आमचं बरं आहे गाडी विकून पैशे कमी मिळतात. जास्ती पैसे भेटतात ते आफ्टरसेल सर्व्हिस मधी. तुमी पण लग्न झाल्यानंतर इन्व्हॉल्व्ह होणारा कंपनी काढा ना! भारी चालेल! खा ना...

**आदीती**

(चमकते.)

हां...

(एक घास खाते.)

**पोपट**

आवडलं?

**आदीती**

हो! मला शेव तिखटच आवडते.

**पोपट**

त्ये नाय! आयडिया! सर्व्हीस आनि मेंटेनन्स तो प्रत्येकाला लागते ना, गाडी असो वा आदमी ! हिकडं तसं काय करता येईन बघा! लग्न जमवा पण त्यानंतर ऑफर्स दया, डिस्काऊंट दया! बददो आयडियाच सुपरहिट छे. अशी कंपनी काढा ज्यात मी प्रफुल्लचं नाव घातलं पाहीजे! घ्ये रे!

(प्रफुल्ल ला ठसका लागतो.)

**प्रफुल्ल**

डॅड, माझे डॅड असूनही यु आर अ जिनियस!

**पोपट**

बरं जेवायला काय घेणार? डाल बाटी? का उंदीयो सांगू?

**निशांत**

(आश्चर्याने)

तुमचं जेवणं राहीलंय?

**CUT TO...**

**21. INT/ NISHANT HOUSE/ DAY**

**निशांत / अदिती / पूर्वा / प्रफ्फुल**

टेबलाच्या मधोमध आठ दहा कप आणि काही रिकाम्या प्लेटस दिसतात.

**निशांत**

माझी पहिली आणि एकमेव अट. नो पत्रिका. आपणहून पत्रिका न पहाणाऱ्या लोकांनीच इथं यावं. इथपासनंच प्रोगेसिव्ह असलं पाहीजे आपण! प्लस पहिल्यांदा मुलामुलीनं एकटयानं भेटाव.

**आदीती**

सर्वात महत्वाचं आहे हिस्टरी चेक करणं. इट मे बी मेडिकल, इकॉनॉमिकल, आॅर प्रोफेशनल.

**आदीती v/o**

आपण चांगल्या लॅबशी टाय अप करायचा. प्रायमरी मेडिकल टेस्ट मध्ये थ्रू झालेली लोकच इथे असतील

**21 A. INT/ BRAND OFFICE 1/ DAY**

## Visual 1

अदिती आणि पूर्वा मिटींग करतायत.

**21 B. INT/ BRAND OFFICE 1/ DAY**

## Visual 2

आदीती आणि प्रफुल्ल एका लाईफस्टाईल ब्रँडच्या ऑफीसमध्ये आहेत. मिटींग करतायत.

**21 C. INT/ HOSPITAL/ DAY**

## Visual 3

अदिती आणि पूर्वा एका लॅब मध्ये आहेत. मिटींग करतायत.

**CUT TO...**

**22. INT/ CAFÉ / DAY**

**निशांत / अदिती / पूर्वा / प्रफ्फुल**

**आदीती**

जागा, नोकरी हयातला खरेपणा कळण्यासाठी टीम अपॉईंट करायचीये. आणि डॉक्युमेंटस मागवायची.

(विठ्ठल मागून त्यांना न्याहाळतोय. )

**आदीती v/o**

कारण हाय सोसायटीत सुध्दा खोटी माहीती देऊन गंडवणारे भरपूर लोकं पाहीलेत मी.

**22 A. INT/ CAFÉ / DAY**

**visual**

एक्सेल शीटमध्ये आकडे टाईप होताना दिसतात.

**22 B. INT/ CAFÉ / DAY**

**निशांत / अदिती / पूर्वा / प्रफ्फुल / विठ्ठल**

सगळे कॅफेत बसलेत. विठठल त्यांच्या जवळ आहे. त्यांच काम पहातोय. त्यात गुंग झालाय. मागून मालक ओरडतो. हा त्याला हातानेच थांब थांब म्हणतो. मालक वैतागून टोपी फेकतो. एक खुर्ची रिकामी आहे. निशांत विठठल ला त्यावर बसायची खूण करतो. विठठल टोपी काढतो आणि त्यावर बसतो.

**CUT TO**...

**23. INT/ NISHANT HOUSE/ DAY**

**निशांत / अदिती / पूर्वा / प्रफ्फुल / विठ्ठल**

**निशांत**

टायअप्स आणि डिस्काऊंटस चं प्लॅनिंग झालय, हयानी लग्नानंतरच एक वर्ष इकॉनॉमीकली कमी त्रासाचं जाईल.

**आदीती**

सगळयात महत्वाचं आहे, ते लग्नानंतर दर महिन्याला त्यांच्याशी बोलणं, ऑबसर्व्ह करणं, त्याची रिडींग्स घेणं आणि त्यांच काऊन्सेलिंग करणं. त्यातूनच त्यांचा बिहेवियर पॅटर्न कळेल. आणि पुढच्या जोडप्यांना त्याची मदत होईल!

**CUT TO**...

**24. INT/ CAFÉ / DAY**

**निशांत / अदिती / पूर्वा / प्रफ्फुल / विट्ठल**

**पूर्वा**

ओके! ऐका! दहा हजार रुपये रजिस्ट्रेशन, मेडिकल आणि हिस्टरी चेक. मग कॉफी शॉप मध्ये मीटींग. बिल आपण देणार.

**प्रफुल्ल**

पहिली मीटींग पॉझिटीव्ह झाली तर मग पंधरा दिवसांनी फाईव्हस्टार मध्ये डिनर. बिल आपनच दयायचं. का दयायचं? हे फार होतंय!

(सगळे हसतात.)

**पूर्वा**

मग बरोब्बर पंधरा दिवसांनंतर घरच्यांनी भेटायचं. बोलायचं. आणि फिक्स करायचं.

**विठ्ठल**

ते करु! कॉफी घ्यायची ना आधी? एक्सक्युजमी, फोर कॅपचीनो, वन शुगरफ्री!

**CUT TO…**

**25. INT/ CAR / DAY**

**निशांत / अदिती / पूर्वा / प्रफ्फुल**

**आदीती**

लग्न ठरलं की मुलाने आणि मुलीने अजून दहा हजार रुपये दयायचे.

**निशांत**

मग ऑफर्स! हनिमून टूर १० परसेंट कॅशबॅक I कपल साठी फिटनेस सेंटर ॲन्युअल डिस्काऊंट ३० परसेंट I होम अप्लायन्सेस खरेदीवर डिस्काऊंट १० परसेंट

**प्रफुल्ल**

बँकेशी बोलणं झालंय, टायअप करुन लोन मिळवायल गाईड करतो बोलतायत! प्लस इन्श्योरन्सच्या रविचा फोन आलेला, फ्री मेडिकल आणि ॲक्सीडेन्टल इन्श्योरन्सचं पण होऊन जाईल!

**आदीती**

वा!! क्या बात है!! तर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी काऊन्सेलिंग सेशन I वर्षातून एक दिवस मेंबर्सची ट्रिप I आणि पहिल्या दिवाळीला १००० रुपयाचं गिफ्ट व्हाऊचर

**25 A. INT/ CAFÉ / DAY**

**निशांत / अदिती / पूर्वा / प्रफ्फुल / विठ्ठल**

सकाळच्या क्लासिफाईडस वर जागा भाडयाने घेणे या कॉलमवर पेन्सील फिरवली जाते. ॲज इफ कोणीतरी पहातयं. एका जागेवर टिक केलं जातं.

**CUT TO…**

**26. INT/ NISHANT HOUSE/ DAY**

**निशांत / अदिती**

(अदिती निशांतच्या रूममध्ये त्याने काढलेले पेंटिंग्ज बघतेय.)

**निशांत**

सगळयात म्हत्वाचं. तुमच्या ओळखीनं कोणाचं लग्न जमलं तर तुमच्या लग्नाच्या पहिल्या वाढदिवसाला तुम्ही भरलेल्या फी मधल्या निम्म्या पैशाचं तुम्हाला गि फ्ट! अन त्याहूनही महत्वाचं, पुढं तुम्हाला जेव्हा केव्हा पोरं होतील तेव्हा त्यांच लग्न शुभविवाह करणार फ्री ऑफ कॉस्ट! म्हणजे फुकट!!

**आदीती**

एवढा अभ्यास मी शाळेत केला असता तर बोर्डात आले असते.

**निशांत**

तुला एक गंमत दाखवायचीये.

शुभविवाह लिहीलेला कॅनव्हास अदिती  बाहेर **काढते**. शुभविवाह च्या खाली ती ‘इथे लग्न टिकते’ असं लिहीते. बोर्ड दिसतो.

**CUT TO…**

**26 A. INT/ CAFÉ / DAY**

**पूर्वा / प्रफ्फुल / विठ्ठल**

फेसबुकवर शुभविवाहचं पेज बनवलं जातं.

**CUT TO…**

**27. INT/ NISHANT HOUSE/ NIGHT**

आदीती निशांतचे फोटो बघतेय निशांत किचनमध्ये कॉफी बनवतोय.

**निशांत**

काय गं बोल की काहीतरी गप्प का आहेस!

**आदीती**

नाही म्हणलं, आपण करतोय सगळं, पण होईल ना नीट?

**निशांत**

होणार ! होणार!

**आदीती**

निशांत, ऐकना मला ना या सिस्टीममध्ये काहीतरी कमी वाटतंय. सगळं सिस्टीमॅटीक आहे पण एक हटके आयडिआ पाहीजे. मी विचार करतेय, दोन अनोळखी लोकं एकमेकांना पहिल्यांदा भेटताना थोडी वेगळया पध्दतीनं भेटली पाहीजेत. काय वाटतंय तुला?

(परत काही फोटो बघतेय आणि तिला हसण्याचा लूप लागतो. तेवढयात लाईट जातात. पूर्ण अंधार निशांत किचनमधून मेणबत्ती घेवून हॉलमध्ये येतो. अदिती आणि निशांत मेणबत्तीच्या उजेडात

समोरासमोर उभे आहेत. अदिती काहीश्या विचारात दिसते. मेणबत्तीकडे बघून काहीतरी सुचल्याप्रमाणे अदिती...)

**आदीती**

दोन अनोळखी लोकं एकमेकांना पहिल्यांदा अंधारात भेटली तर?

(हे वाक्य बोलताना ती मेणबत्तीला फुंकर मारते आता सर्व घरात अंधार.)

**आदीती**

चेहरा, रंग रुप, आकार, काहीच माहीत नाही, फक्त बोलायचं. आणि बाहेर यायचं. आणि अंदाजे वर्णन सांगायचं. मग मॅच करुन बघायचं. केवढा वेगळा असेल असा ब्लॅक रुमचा एक्स्पीरीयन्स!

**निशांत**

अनायासे अंधारही आहे. आदीती, आपल्यापासनं सुरुवात करुया?

**आदीती**

तू काय अंधाराचा फायदा घेऊन लाईन मारतोयस माझ्यावर? चिंचवडला ये बरोबर अंधार दाखवते.

(तेवढ्यात लाईट येतात. दोघं हसतात.)

**आदीती**

(हसत)

बघ एमएसइबी च्या सुध्दा मनात नाहीये, आपल्यापासून सुरुवात व्हावी!

(त्यांना कळत ते एकमेकांच्या जरा जास्तीच जवळ उभे आहेत.निशांत नरमतो. तेवढ्यात त्याचा फोन येतो. )

**निशांत**

उदया आणखी एक जागा बघायला जायचंय.

**CUT TO...**

**28.INT/ DAY/ OFFICE SPACE**

खिडकी उघडली जाते. एजंट उभा आहे.

**एजंट**

एकदम घर एक मंदीर टाईप जागा आहे. पंधरा रेन्ट, पन्ना डिपॉझिट, ब्रोकरेज, दोन महिन्याचं भाडं, रजिस्ट्रेशन निम्मं निम्म! पप्पू बोलणार तर एकदा बोलणार! डन?

**निशांत**

डन! डन!

(आदीती तरातरा चालत आत येते.)

**आदीती**

डन काय? समोर **माहितीय** ना काय आहे ते!

(नलू ताई परमधाम दिसतं.)

परदेशी! कॅन्सल! दुसरी जागा बघा!

**एजंट**

दुसरा एजंट बघा त्यापेक्षा. पप्पू बोलणार तर एकदाच बोलणार . लेना है तो अभी लो. कल हो ना हो!

**निशांत**

मी काय म्हणतो, असू दे न असले तर त्यात काय प्रॉब्लेम आहे?

**आदीती**

त्याही लग्न जुळवतात. आपणही लग्न जुळवतो. पुढे काही कॉम्प्लीकेशन नको व्हायला.

**निशांत**

असा विचार केला असता तर लोणावळयातच चिक्कीची दुकानंच निघाली नसती. अगं आमच्या एका कॉलनीत समोरासमोर चार मेडिकल स्टोअर आहेत. काही फरक पडत नाही.

**आदीती**

हे दुकान नाहीये, आणि हे इतकं सोप्प नाहीये. ती बाई प्रेशर्स आणू शकते.

**निशांत**

आदीती, हे सगळं घडताना मला तुझ्या मनात उगाचच हे अनसक्सेफुल होईल किंवा यात काही प्रॉब्लेम येतील अशी भिती दिसतेय. लोकांनी आपल्याला सहानूभूती दाखवावी असा एक मनातून वाटतं तुला. आणि सहानूभूतीची अपेक्षा करणारी लोकच अनसक्सेफुल होतात. लक्षात ठेव, जे होईल ते होईल, आपण दोघं मिळून करु! जागा नको सोडायला! पप्पू मी पण बोलणार तर एकदाच बोलणार जागा डन!

**पप्पू**

चलो कोई मिल गया! ओपनिंग कधी आहे?

**CUT TO…**

**29.INT + EXT/ DAY / OFFICE SPACE**

शुभविवाह ऑफिसचं उद्घाटन होतं. पंधरा वीस लोकांची गर्दी जमलेली आहे. निशांत आदीती आणि मधोमध आजोबा बसलेले. ते आदीती आणि निशांत कडे पहातायत.

**आजोबा**

कसं आहे बर्वे! मी स्वतः ज्योतिषी असलो तरी पत्रिका न बघणारी लोक जास्त आवडतात मला. कारण बरीचशी माणसं विदयेची मदत नाही घेत! आहारी जातात!

**निशांत**

एक्जॅक्टली! आयुष्यातला सरप्राईज एलिमेंटच घालवून टाकतात सगळं विचारुन!

**आजोबा**

अगदी खरं! आज धंदा सुरु करु का? दहा नंतर घरातून बाहेर पडू का? चार च्या आत पैसे देऊ का? लघवीला जायची वेळ बघत नाहीत नशीब! घाबरतात तर इतके की यांना सुई टोचली तरी ती साडेसाती चालू आहे म्हणून असं वाटत असतं. बरं उपासनेच्या नावाने शंख. रोज दारु प्यायची, सिगारेटी फुंकायच्या आणि हातात रत्न घालायची, काय त्याचा उपयोग?

**निशांत**

आणि आता तर त्यात पण इतके प्रकार झालेत. हा विठ्ठल! परवा स्पेलिंग विचारलं तर, व्हीआयटीटीएचएचएएल म्हणाला! का तर कुणी न्यूमोरॉलोजिस्ट ने सांगीतलंय.

**विठ्ठल**

पिंकीच्या काकानी सर!

(आदीती हसते.)

**आजोबा**

असो, तुमच्या या शुभविवाहाला माझ्या शुभेच्छा आणि पाठींबा दोन्ही आहे. फक्त जे कराल ते, शांतपणे आणि जपून करा. आणि लोकांची लग्न लावता लावता वेळ घालवू नका. स्वतःचही बघा!

(सगळे हसतात.)

**CUT TO…**

**30. EXT/ NIGHT/ OFFICE SPACE**

आजोबा निघून जातात. सगळे बाहेर थांबलेत. एक एक करुन निघून जातात. निशांत आणि आदीती दोघंच उरलेत. समोर नलू ताईंच्या बॅनरला लाईटच्या माळा लावल्यात. दोघे समोर पहातात. मागे पहातात.

**निशांत**

तुला एक विचारु? तू कधी कोणाच्या प्रेमात नाही पडलीस?

**आदीती**

बाबा! दर्दी विषय काढलास तू एकदम! नाही… एक दोन होती, पण अकरावी बारावी…तू?

**निशांत**

अकरावी बरी होती माझी, पण बारावी फारच कमाल होती!

(दोघे हसतात.)

**आदीती**

निशांत तुझ्यामुळे आपल्याला हे करता आलं. थँक्स!

(त्याला मिठी मारते. तो एक क्षण हडबडतो. ते उभे असतानाच दोन जण जोरात गाडीवर जातात.)

**गाडीवरचा पोरगा**

(ओरडत)

लगे रहो इंडीया! लगे रहो.

(दोघे हसतात.)

**निशांत**

पैसे गेलेत! आता परत कसे येतात ते बघू...चला!

(तिथून निघतात.)

**CUT TO...**

**31. INT/ DAY/ OFFICE SPACE**

(टाईम लॅप्स! संध्याकाळ झालीये. पूर्ण शांतता. बाहेरुन ऑफीस दिसतं. आत सगळे बसलेले दिसतात. मग एक एक जण शांतपणे वाट पहात बसलाय असं कळतं. एक मुलगा आत येतो. तसे सगळे त्याच्या भोवती जमा होतात.)

**मुलगा**

काल ॲड पाहीली होती. मला नाव नोंदवायचंय.

(सगळे जोर जोरात ओरडतात. मुलगा घाबरुन पळून जातो. विठ्ठल त्याला परत आणतो. सगळे त्याला मिठी मारत ओरडतात. तोही खुश होतो. फॉर्म भरला जाताना दिसतो.)

**CUT TO...**

**32. INT/ DAY/ RANDOM HOUSE**

(एक बाई घरात कोणाशीतरी फोनवर बोलतेय.)

**एक बाई**

ऐकलीत का शुभविवाह नावाची संस्था! पत्रिकेशिवाय लग्न लावणार म्हणे! फालतूपणा नुसता! पण आमची भाची उडया मारायला लागली लगेच, नाव नोंदवायचं म्हणून.

**CUT TO...**

**32 A. INT/ DAY/ TEKDI**

टेकडीवर दोन आज्जी दिसतात.

**१**

आधी एकटयानंच भेटायचं म्हणे! आणि एकमेकांना समजून घेऊन मग लग्न करायचं! आपल्या काळात असं असतं तर काय सांगू?

**२**

हो ना! वशाची अजून आठवण येते.

(दोघी टाळया देऊन हसतात.)

**CUT TO...**

**32 B. INT/ DAY/ COLONY**

विठठल आणि प्रफुल्ल गाडीवरुन एका एरियात जातात. एक दोन जणांकडे चौकशी करतात. फॉर्मवर टू बीएचके स्वतःचं घर असं एका मुलानं लिहीलंय, त्याच्यावर टिक करतात.

**CUT TO...**

**32 C. INT/ DAY/ OFFICE SPACE**

पूर्वा एका ऑफीसमध्ये फोन करते. एका मुलीबददल विचारते. असिस्टंट प्रोग्रॅमर डेसिग्नेशन लिहीलंय, त्यावर टिकमार्क करते.

**CUT TO...**

**32 D. EXT/ DAY/ OFFICE SPACE**

नलू ताई येतात. गाडीतून उतरतात. आणि पाहून न पाहील्यासारखं करत वर निघून जातात.

**CUT TO...**

**32 E. INT/ DAY/ CAFÉ**

दोन मुलं कॅफेत बसलेली आहेत.

**१**

इंटरेस्टींग आहे. अरेंज मॅरेजच्या सगळया प्रोसेसमध्ये एक ऑकवर्डनेस असतो. तो जाईल हयानी. आणि लग्नानंतरचा विचार करतायत रे. हे सुचलं नाहीये कोणाला आधी. मी तर जाऊन बघणारे.

(आय पॅड वर शुभविवारचं पेज उघडतो.)

**CUT TO...**

**32 F. INT/ NIGHT/ NALUTAI HOUSE**

तेच पेज दिसतं, नलू ताई पहातायत. बंद करतात.

**CUT TO…**

**33. INT/ DAY/RADIO STATION**

रेडिओ स्टेशन दिसतं. आदीती आणि निशांत बसलेत.

**आर जे**

पुण्यात तुमच्या या नवीन व्हेंचरला हळुहळू चांगला रिस्पॉन्स मिळतोय. काय सांगाल?

**आदीती**

लग्न ही फार महत्वाची गोष्ट आहे आयुष्यातली. तिचा सगळया बाजूनी विचार करायचा प्रयत्न आम्ही केलाय. लग्नात होणारी फसवणूक, मेडिकल हिस्टरी न सांगण,

**निशांत**

भविष्यावरचा नको तेवढा विश्वास! आजचा अॅप्रोच घेऊन आम्ही लग्न जमवतोय. लग्नानंतर दहा आॅफर्स देतोय ज्यातून त्यांना संसार करणं सोप्प होईल!

**आदीती**

हो आता पहिलं लग्नही लागेल शुभविवाह मधून.

**आर जे**

वेल! सुपर्ब ! कोण आहेत ते दोघं?

**CUT TO…**

**34.INT/ DAY/BLACKROOM**

( फक्त दोघांच्या बोलण्याचे आवाज येतात.)

**राहुल**

मी राहुल… आयला बहुतेक मला एकटयाला सोडलंय इथे.

**आनंदी**

(थोडया वेळाने)

मी आनंदी!

**राहुल**

आहे आहे! हुश्श! शेकहँड केला असता पण अंधारात काहीच दिसत नाहीये. तुझं नावं आनंदी आहे का स्वभाव?

**आनंदी**

(हसते.)

दोन्ही! मी ट्रॅव्हल एजन्सीत काम करते तू?

**राहुल**

मी कुठेही गेलो की सगळयात आधी शाळा सांगतो! नूमवि ! तू?

**आनंदी**

मी हुजुरपागा!

**राहुल**

(हताशपणे)

अरे व्वा! सगळंच जुळून आलंय!

**आनंदी**

खूप ठिकाणी पत्रिका दाखवल्या घरच्यांनी, काही मुलांना भेटले पण. ती खूप बोअर होती. म्हणून आले.

**राहुल**

मी तीनच मुलींना भेटलो. लेले बोअर होती, भिडे जाड होती, आणि केळकर गोड होती पण तिला मी नाही आवडलो. मग म्हणलं जरा नवीन काहीतरी करावं. म्हणून इकडे आलो.

**आनंदी**

हं... तुला आयडिआ कशी वाटली ब्लॅकरुमची?

**राहुल**

खूप चांगली वाटली

(समंजसपणे)

मी तुला कधीच पाहीलं नाही, आणि तू मला! पण आवाजावरुन माझ्या मनात तुझं एक चित्र तयार झालंय आणि तुझ्या मनात माझं. समजा आपलं लग्न झालं नाही, तर मी, तू खरी कशी दिसतेस हे कधीच आपणहून शोधणार नाही. आणि समजा आपलं लग्न झालं तर आपल्या आयुष्यभर लक्षात राहील की आपली पहिली भेट एका अंधाऱ्या खोलीत झाली होती जिथे फक्त बोलण्यावरुन आपल्याला वाटलं की पुढे भेटावं. आनंदी, ऐ, आनंदी झोपलीस का गं?

**आनंदी**

(हसते.)

नाही नाही!

**राहुल**

मग, कॉफी प्यायला भेटूयात ना?

**CUT TO**...

**35.EXT/ DAY/CAFÉ**

**आनंदी**

तू खरंच प्रयत्न नाही केलास मी कशी दिसते हे शोधायचा?

**राहुल**

तू एवढी चिकणी असशील असं वाटलं नव्हतं मला.

**आनंदी**

मागची लोकंएवढी आनंदानी का पहातायत?

**राहुल**

माझे मित्र आहेत ते. टॉयलेट मध्येही मला एकटयाला जाऊ देत नाहीत सतत मागे मागे असतात.

(मागे वळून)

अरे !! जा ना!

(दोघे तिघे जातात. समोर बघत)

तर आनंदी, मी माझ्या लग्नाच्या बाबतीत फार एक्साईटेड आहे. मित्र मला काट्यावर आलाय असंही म्हणतात. पण मी खरच एक्साईटेड आहे. आणि मला तू आवडलीस!

**आनंदी**

बाप रे अचानक! अजून दहा पंधरा दिवस आहेत ठरवायला.

**राहुल**

हां म्हणजे आपण लंडन मध्ये असतो तर थेम्स नदीच्या काठी मागे व्हायोलीन्स वाजत असती आणि मी गुडघ्यावर बसून तुला विचारलं असतं, वील यू मॅरी मी? पण हे लंडन नाही, पलिकडे थेम्स नाही आणि मागे व्हायोलिन्स पण नाहीत.

**आनंदी**

मी वाजवते व्हायोलीन.

**राहुल**

काय? मोहबत्ते? राज आर्यन!

**आनंदी**

इ... मी चार वर्ष शिकलेय.

**राहुल**

(आश्चर्याने)

कमाल!! मला मुली फक्त तोंड नाहीतर कानाखाली वाजवतात एवढं माहीती होतं.

(हसतो.)

अय एम जोकींग!

**आनंदी**

बरं घरचे काय म्हणाले?

**राहुल**

खुश! मुलाला झेलायला ऑफीशीयली कुणीतरी मिळणार हयाचा आनंद! तुझ्या घरी.

**आनंदी**

मी स्वतःहून लग्न ठरवलंय याचा त्यांनाही आनंद झालाय.

**राहुल**

(अविर्भावात)

तो मैं ये रिश्ता पक्का समझूं?

(हसतो. ती पण हसते.)

काय मागवायचं खायला?

**CUT TO…**

**36.INT/ NIGHT/ FIVE STAR**

खायच्या दोन तीन प्लेटस येतात. राहुल आणि आनंदी बसले आहेत.

**राहुल**

आपल्याला ब्लॅक रुममध्ये भेटून एक महिना झाला आज. आत्ता याच वेळेला आपण पहिल्यांदा एकमेकांशी बोललो होतो.

**आनंदी**

एवढं लक्षात आहे तुझ्या.

**राहुल**

मला छोटया छोटया गोष्टी लक्षात ठेवायला आवडतात. आनंदी, आपण एक महिना भेटतोय. सगळं सेट आहे. माझ्यासारखा ऑकेजनलीच दारु पिणारा गुणी मुलगा आहे. घर आहे. घरी चोवीस तास पाणी आहे. पाईप्ड गॅस आहे.

(ती हसते.)

टापटिप आहे, काटकसरी आहे, आणि माझं ठरलंय एंगेजमेंट वगैरे नाही करायची. डायरेक्ट लग्न! एकतर खर्च वाचतो आणि मोडाबिडायची रिस्क पण नसते.

**आनंदी**

(त्याच्याकडे पहात) खरं आहे!

**राहुल**

तू बोल ना?

**आनंदी**

मी फार बोलत नाही. शांत असते.

**राहुल**

कमाल! माझं इनकमिंग बंद आहे आणि तुझं आऊटगोईंग! असेच पाहीजेत गं नवरा बायको.

**आनंदी**

चोवीस तास तीनशे पासष्ट दिवस असं जगायला कसं जमतं?

**राहुल**

एक वर्षात कळेल तुला...

(हसायला लागतो.)

कळव मला. हो म्हणालीस तर आवडेलच, नाही म्हणालीस तरी आपण चांगले मित्र राहू वगैरे असलं काही होणार नाही हां.

(दोघे हसतात.)

**CUT TO...**

**37.INT/ DAY/ OFFICE**

**आदीती**

(फोनवर बोलतेय)

हां बोल रे ! झालं? काय ठरलं? किती सव्वीस तारीख! अप्रतिम!

(फोन ठेवते. आणि जोरात ओरडते.)

शुभविवाहचा पहिला विवाह शनिवार सव्वीस तारीख, फडके हॉल!

(सगळे समोर स्तब्ध उभे. आदीती शांतपणे परत बसते. चष्मा लावते.)

सगळयांच अभिनंदन!

(पुढच्याला)

नेक्स्ट?

**CUT TO...**

**38.INT/ DAY/KARYALAY**

राहुल आणि आनंदीचं लग्न आहे. अक्षता टाकल्या जातात. फोटो काढले जातायत. दोघे हसतायत. दोन चार मित्र येतात. डायरेक्ट येऊन दोघांच्या पाया पडतात आनंदी ऑकवर्ड होते. पूर्वा प्रफुल्ल हसतात. विठ्ठल तिथल्या शुभविवाह च्या काउंटर पाशी बसलेला आहे. शेजारुन नलूताई येतात. निशांत आदीती हसता हसता थांबतात. त्यांना ग्रीट करायला शेजारी येतात. तेवढयात नलू ताई आणि त्यांचे भक्त थेट स्टेजवर येतात.

**नलू ताई**

आशीर्वाद! आशीर्वाद!

**राहुल**

बरोबर आहे पण आपण कोण?

**नलू ताई**

कुलकर्णी मोने लग्न ना?

**राहुल**

हे कुलकर्णी माडगूळकर! ते वरच्या मजल्यावर! पण आलाच आहात तर जेऊन जा. आमचे केटरर जास्त चांगले आहेत.

**नलू ताई**

गोंधळ घालतात ही लोक!

(या दोघांकडे पहातात)

साक्षात बर्वे! अँग्री यंग मॅन! तुम्ही केलेला पराक्रम आहे तर हा...शुभविवाहचं पहिलं लग्न! चांगलं आहे.

**निशांत**

बाजूला येऊन बोलूयात? उगाच चार चौघात अपमान होईल. तुमचा.

(निशांत त्याच्या शेजारी आदीती आणि समोर नलू ताई आणि मागे भक्त असे उभे.)

**नलू ताई**

चांगल आहे. मागच पुढचं न पहाता लग्न लावत सुटायचं. कौतुक वाटत मला तुमचं.

**निशांत**

थँक यू! मग काय होताय आम्हाला जॉईन?

**नलू ताई**

हया दोघांच लग्न लावलंयत ना तुम्ही? अवघड आहे हयांच.

**निशांत**

लग्नानंतर अवघड होतात गोष्टी! तुमच्या नवऱ्याला अनुभव आला असेल की.

(एक दोन भक्त त्याच्याकडे सरसावतात.)

**आदीती**

चल तू!

(त्याला घेऊन जायला लागते.)

**नलू ताई**

या जोडप्याची पत्रिका मागवा. नक्की काहीतरी गडबड आहे! हया गाढवाला चांगली अददल घडवते. नाही ना सहा महिन्यात हा बाजार बंद पाडला, नावाची नलिनी दिक्षित नाही.

**CUT TO...**

**39.INT + EXT/ EVENING/OFFICE**

आदीती आणि निशांत दार लावून आत ऑफीसमध्ये येतात. दोघेही दमलेत.

**आदीती**

होपफुली आता एन्क्वायरीज अजून वाढतील. यांची जाहीरात केली पाहीजे.

**निशांत**

(स्वतःत)

हो, उदया चॅनलची लोकं पण येणारेत त्यांचा बाईट घ्यायला. आदीती तू मला थांबवायला नको होतसं. मी तिला तिथच आडवं पाडलं असतं. आणि तू अशी घाबरल्यासारखी चल चल काय म्हणालीस? आँ?

**आदीती**

सहज!

(शांत आहे.)

**निशांत**

काय गं?

**आदीती**

काही नाही!

(डोळयातून पाणी येतं. तो उठून तिच्या जवळ जातो. तिच्याकडे पहातो. दोन क्षण जातात. तो तिच्या चेहऱ्यावरुन हात फिरवतो. मिठी मारतात.

**LOVE SONG**

**39A.INT / DAY /OFFICE**

निशांत ऑफिस मध्ये internet वर "love calculator" वर स्वतः अाणि अादिती चे नाव टाकून बघत अाहे.

**39B.INT / DAY /OFFICE**

निशांत ऑफिसमध्ये बसल्या बसल्या आदिती चे चित्र काढत आहे. तेवढ्यात आदिती त्याच्या जागेवर येते. निशांत झटकन चित्र लपवतो. आदिती च्या लक्षात येते की निशांत काहीतरी लपवत आहे. ती ते चित्र ओढून घेते आणि पहाते. निशांत लाजतो आणि स्वतःच्या डोक्यावर हात फिरवत हसतो.

३) एक सुंदर मुलगी ऑफिस मध्ये येते -- तिला पाहताच, निशांत मुद्दाम विठ्ठलला तिला त्याच्या कडे घेऊन यायचा इशारा करतो -- तेवढ्यात आदिती हे बघते आणि त्या मुलीला स्वतःच्या केबीन मध्ये घेऊन जाते -- ती निशांत कडे बघून चिडवते - निशांत हसतो.

४) एक दिवस निशांत आदितीच्या आधी ऑफिस मध्ये येतो -- तिच्या डेस्क वर गुलाबाचे फूल ठेवतो आणि स्वतःच्या जागेवर जाऊन बसतो -- आदिती येते -- फूल बघते -- हळूच शेजारी तिरक्या नजरेने बघते -- लाजते व ते फूल गुलदस्त्यात ठेवते -- हे सगळे पूर्वा, प्रफुल्ल व विठ्ठल पाहतात -- विठ्ठल मुद्दाम ते फूल कचरा पेटीत टाकायला जातो -- आदिती पळत जाऊन ते फूल ओढून घेते -- सगळे गुपचुप हसतात.

५) आदिती समोर एक उपवर मुलगा बसला आहे -- तिच्या पलीकडे निशांत बसून टकमक तिच्या कडे पाहत आहे -- आदितीच्या लक्षात येते आणि ती त्याला खुणवून विचारते -- तो काही नाही असं इशरा करतो.

६) निशांत रात्री आदिती ला miss करत आहे - तो तिला sms करतो - ती पण त्याला reply करते - दोघेही हसतात - good night करतात आणि झोपतात

exterior

१) निशांत आणि आदिती वेगवेगळे येतात -- गाडी पार्क करतात -- तेवढ्यात अवचित् पाऊस येतो -- दोघेही आपापल्या ठिकाणी उभे राहून मनोसक्त भिजतात -- तेवढ्यात त्यांच्या लक्षात येते की ते भिजत आहेत -- दोघेही मग पळत ऑफिस च्या दरवाजाकडे येतात -- समोरासमोर आल्याने एक मिश्किल क्षण त्यांच्यात जातो -- आदिती लाजते आणि ऑफिस मध्ये निघून जाते

२) निशांत मुद्दाम स्वतःच्या गाडीची किल्ली लपवतो - आदिती त्या दिवशी scooty वर आली असते - तो तिला तिच्या बरोबर येण्याचे विचारतो - ती त्याला Ok म्हणते -- cut to -- निशांत गाडी ढकलत येत आहे - आदिती त्याच्या बरोबर हसत चालत येत आहे - ती थांबते आणि त्याला त्याच्या गाडीची किल्ली दाखवते

३) सकाळी आदिती जॉगींग करत आहे - निशांत सायकल वर तिचा पाठलाग करत आहे - आदिती ला ते कळतं - ती झटकन मागे वळून पाहते - निशांत सायकल वरून पडतो - आदिती हसत हसत जॉगींग करत पुढे जाते

४) निशांत गच्चीवर अदितीचे पेंटींग करत आहे

**OUTDOOR LOCATION DREAM SONG**

## 40: EXT + INT/ DAY/ OFFICE

(ऑफिसच्या बाहेर निशांत आणि आदिती वेगवेगळे येतात -- गाडी पार्क करतात -- तेवढ्यात अवचित् पाऊस येतो -- दोघेही आपापल्या ठिकाणी उभे राहून मनोसक्त भिजतात -- तेवढ्यात त्यांच्या लक्षात येते की ते भिजत आहेत -- दोघेही मग पळत ऑफिसमध्ये पळत येतात. समोरासमोर आल्याने एक मिश्किल क्षण त्यांच्यात जातो -- आदिती लाजते दोघे आणखी जवळ येऊन एकमेकाच्या ओठावर ओठ टेकवणार तेवढयात त्यांना त्याची जाणिव होते अदिती तिथून निघून जाते.)

## 40 A: EXT / DAY/ OFFICE

(बाहेर राहुल आणि आनंदीचं होर्डिंग लावताना सगळे. होर्डिंगवर लिहीलंय

'आमचा शुभविवाह शुभविवाह मुळे जमला! आणि आपला?'

शुभविवाह ची पहिली यशस्वी जोडी. शुभविवाह, इथे लग्न टिकते. तेवढ्यात नलूताई येतात.)

**नलू ताई**

नेम धरुन खडडयात उडी मारलीयेत! तोंडावर आपटणार आहात! मी म्हणले होते, तेच झालंय. घ्या

(त्यांच्या हातात पत्रिका देतात.)

**निशांत**

इतके दिवस तुम्ही वेडयासारखं बोलताय असं वाटत होतं पण आता माझी खात्री पटलीये की तुम्ही वेडयाच आहात.

**नलू ताई**

हो रे! तू एकटाच तेवढा शहाणा. हे घे तुझ्या शहाणपणाचा रिझल्ट. दोघांच्या पत्रिका पाहील्यात मी. शत्रूच्याही नशीबात असा योग येऊ नये. तीन गुण जुळतायत, एक नाड आहे, मुलीला मंगळ आहे आणि मुलाला कालसर्प योग, शिवाय गंडांतर...

**निशांत**

या योगांपेक्षा त्यांच्या नावानीच घाबरायला होत असेल समोरच्याला. ते माहीतेय ना तुम्हाला साप चावलेला माणूस विषामुळे नाही, साप चावल्याच्या धक्याने हार्टअटॅक येऊन मरतो बऱ्याचवेळेला. तसंच आहे हे. कळेल असं सांगा. म्हणजे तुम्हाला कळलं असेल तर!

**नलू ताई**

तुला सायंटिफीक भाषेत ऐकायचंय ना? ऐक मग! एक नाड म्हणजे मॅरीटल लाईफ मध्ये प्रॉब्लेम, मंगळ म्हणजे सेक्शुअल प्रॉब्लेम, कालसर्प योग म्हणजे लग्नानंतर प्रचंड मानसिकत्रास आणि गंडांतर म्हणजे त्या कुणा एकावर मृत्यूचं संकट! सहा महिन्यानंतर त्यांच्या वाटा स्पष्ट वेगळया दिसतात. त्यामुळे सहा महिन्यात घटस्फोट ठरलेला. पत्रिका म्हणजे रिग्रेसिव्ह वाटते आणि ज्योतिषी म्हणजे मूर्ख! अरे ज्या अमेरकितून आलास तिथली लोकं येतात माझ्याकडे पत्रिका बघायला तू मला काय सांगतोस? कुठला तरी इंग्लीश इन्फ्लूएन्स घ्यायचा, इथे ते सगळं आपण शोधलंय असं दाखवायचं आणि अरॉगन्टली बोलायचं! कोण समजता कोण तुम्ही स्वतःला? आणि तू गं? तुला नका कळायला?

**निशांत**

माझ्याशी बोला. पत्रिका भविष्य बघून सुध्दा लग्न मोडलेली हजारो लोकं आहेत जगात. आणि अंधश्र्ध्दाळू आणि बेअक्कल लोक कुठेही असतात भारत असो वा अमेरिका! म्हणून तुमच्यासारख्या लोकांचं फावतं. आणि तुम्ही भीती कसली दाखवता? भविष्याची? त्यांचं वाईट होईल याची? होऊ दे वाईट! मी तर म्हणतो आता क रुनच दाखवा वाईट! तुम्ही काय भविष्यात जाऊन वाईट करणार त्यांच? आणि कसलं भविष्य भविष्य हो? एवढंच टिमकी वाजवताना की अमुक अमुक हिरोला सांगीतलं फिल्म हिट होणार! यंदा वर्ल्डकप आपण जिंक णार! मग हे कळत नाही का तुमच्या भविष्यात की अमुक अमुक तारखेला बॉम्ब स्फोट होणार! किंवा या दिवशी दंगली होणार! दोन वर्षानी दुष्काळ पडणार! अहो जन्माच्या वेळेच्या सेकंदावरुन बदलणारा खेळ हा! तुम्ही काय, ब्रहमदेवाचा बाप तरी सांगू शकेल का हया दोघांच्या जन्मवेळा हयाच म्हणून? आणि तुम्ही आम्हाला घाबरवताय? हया, दोन पत्रिकांवरुन? नाईस ट्राय! पण जमलं नाही!

**नलू ताई**

मुळात मी तुम्हाला घाबरवत नाहीये जाणीव करुन देतीये. फक्त जे घडणारे त्याला सामोरं जायला तयार रहा. ती ताकद, सहनशक्ती आधी स्वतःत आणा, मग इतरांना दया! आणि रहाता राहीला प्रश्न आपल्या वादाचा, तर जर सहा महिन्यात ते वेगळे झाले तर सगळयांसमोर हे दुकान बंद करायचं आणि माझी माफी मागायची! बोल आहे हिम्मत?

**निशांत**

एकतर तुम्ही दुकान म्हणणं बदं करा! ते तुमचं! आणि हिम्मत म्हणाल तर ती खूप आहे, तुम्हाला पुरुन उरेल इतकी. मी घेतलं तुमचं चॅलेंज! सहा महिने तुम्ही आहात आम्ही आहोत आणि ते आहेत! तुम्ही पत्रिकेची चौकट जेवढी आवळता येईल तेवढी आवळा, मी ती आणि तुमची ही भविष्यवाणी तोडून मोडून नाही उलथीपालथी केली ना, नाव लावणार नाही!

(आदीती त्याच्याकडे पहाते.)

**नलू ताई**

असं, मजा येईल तुम्हाला सरळ करायला!

**निशांत**

एवढया वाकडयात शिरु नका. स्वतःच सरळ व्हाल!

(त्या निघून जातात. निशांत आणि आदीती उभे आहेत. हातात पत्रिका.)

**CUT TO...**

**41.INT/ NIGHT/AADITI HOME**

आजोबा पत्रिका पहातायत. निशांत बाहेर उभा आहे. आदीती शेजारी बसलीये.

**निशांत**

मला हे पटत नाहीये.

**आदीती**

मी फक्त मदत म्हणून विचारतेय. आपण पत्रिका कधीच बघणार नाही म्हणून तिने घाबरवायला नको.

**निशांत**

पण गरज काय? आणि कशाला लक्ष दयायचंय?

**आजोबा**

लक्ष दयायचीच गरज आहे बाळा. तीन गुण जुळतायत, एक नाड आहे, मुलीला मंगळ आहे, शिवाय गंडांतर...वाद, भांडण, हयातनं घटस्फोट किंवा मृत्यूसारखं संकट, काहीही ओढवू शकतं! अवघड आहे!

(पुन्हा एकदा निरखून पहातात! दोघे चमकून पहातात. निशांत आदीती प्रश्नार्थक)

**CUT TO...**

**42.EXT/DAY/ROAD**

हनिमूनसाठी आनंदी आणि राहुल कारने जाताना दिसतात.

# <u>मध्यंतर</u>

**43.INT/DAY/AADITI HOME**

आजोबा बसलेले आहेत. निशांत दारातच उभा आहे. आदीतीच्या चेहऱ्यावर काळजी.

**आजोबा**

सहा महिने त्रास आहे, पण समजा हे सहा महिने यांनी पार केले तर पुढे पन्नास वर्ष टिकेल हे लग्न! त्यासाठी एकच करावं लागेल.

**आदीती**

तुम्ही सांगा आम्ही वाटटेल ते करु!

**निशांत**

तू कर! माझा विश्वास नाही.

**आदीती**

प्रश्न तुझ्या विश्वासाचा नाहीये, त्या दोघांच्या आयुष्याचा आहे.

**निशांत**

कुठल्या जगात वावरतोय आपण? होऊ दे ना काय व्हायचं ते! आपण बघूना! कशाला आधी कळायला पाहीजे? एवढया लगेच घाबरुन का जायंच?

**आजोबा**

शांत हो! फक्त पुढचे सहा महिने त्यांना भांडू देऊ नका. कारण त्या भांडणातूनच पुढचं सगळं विस्कटत जाणारं

**आदीती**

मी घेईन काळजी. मी नाही त्यांना भांडू देणार!

**निशांत**

तू काय बेडरुम मध्ये घुसणारेस का रोज त्यांच्या? तुझं झालं की मला सांग मी बाहेर उभा आहे!

(निघून जातो. आदीती आणि आजोबा पहातात.)

**आजोबा**

मला समजतीये तुझी काळजी.

**आदीती**

मी आलेच, त्याला सोडून.

**44. EXT/DAY/AADITI HOME**

आदीती येते. निशांत वळतो.

**निशांत**

काय हे? कुठल्या सिस्टीममध्ये जगतोय आपण?

**आदीती**

तुझं काय रे सिस्टीम सिस्टीम चाललंय? कुठून आणि का सुचलं तुला हे सगळं? तुझं लग्न मोडलं म्हणून सुचल ना? अदरवाईज तु सुध्दा खूश असतास, अमेरिकेत! तुला काही पडलेली नसती इथल्या लग्नाच्या सिस्टीममध्ये काय चाललंय हे बघायला! निशांत भीती म्हण किंवा काळजी, मला एवढच कळत की त्यांच लग्न आपण वाचवायला हवं, त्यांचा संसार आपण टिकवायला हवा! आणि ते फक्त आपलं पहिलं कपल आहे म्हणून नाही, उदया माझ्या मैत्रीणीच्या आयुष्यात जरी असं झालं असतं तरीही मी तितक्याच आपलेपणानं केलं असतं.

(तो शांत आहे.)

**CUT TO...**

**45.INT/ NIGHT /HOTEL LOBBY**

आनंदी दमून बसते. खूप दमलीये. राहुल रिसेप्शनवरुन येतो.

**राहुल**

क्लीन करतायत रुम . एक दोन मिनिटात मिळेल बाळा.

(बॅग उचलतो.)

**आनंदी**

कोण बाळा? राहुल आणि आपण प्लीज झोपून जाऊया, मी प्रचंड दमलीये.

**राहुल**

अरे अरे... ठीक आहे गं, झोप तू! अंगाई कुठली आवडते सांग, म्हणजे तसा रियाझ करायला.

(एक क्लीनर येऊन डन असं सांगतो. राहुल थँक यू म्हणतो. दोघे चालायला लागतात.)

**आनंदी**

नको नको, लगेच झोपेन मी. अडीचशे जणांना वाकून नमस्कार म्हणजे पाठीचा कणा तुटायचा राहीला होता!

**राहुल**

अगं हे तर काहीच नाही, माझ्या मित्राच्या लग्नात सात हजार लोकं होती. तो आणि त्याची बायको स्टेजवर वाकूनच उभे होते. वर्गाच्या बाहेर अंगठा धरुन उभे असतात ना तसे. लोकं पुढे पुढे सरकायची. शेवटपर्यंत कळलं नाही त्याला लग्नाला कोण कोण आलं होतं ते.

**आनंदी**

तू समोरच्याला हसवायला काहीही सांगू शकतोस ना?

**CUT TO...**

**46.INT/ NIGHT /HOTEL ROOM LOBBY**

(दोघे आत येणार तेवढयात दार उघडतं. आणि आतून त्याचे चार पाच मित्र बाहेर येतात)

**सगळे**

सरप्राईज!!!

(आनंदी आणि राहुल हबकतात.)

**१**

कसं वाटलं सरप्राईज? आँ? जोरदार तयारी करुन ठेवलीये. कालच काकूंना विचारला पत्ता. रात्री ठरलं, निघालो आणि आलो. आपले प्लॅन तर तुला माहीतीचेत! रांगरिंग आलो!

**२**

चला इथंच गप्पा मारत बसूयात! काय आनंदी? मी तर बाबा दोन वाजेपर्यंत थांबणारे!

**राहुल**

मी तुला म्हणलं ना, सात हजार लोकंहोती हाच तो!

(राहुल ऑकवर्ड होतो.)

**आनंदी**

मी खूप दमलेय, प्लीज झोपू दया!

**३**

आता काय झोपायचंच आहे! आमचं बिल दया आम्ही निघतो. काय हो?

(सगळे हो हो म्हणतात)

**राहुल**

(खिशातून पैसे काढतो. पाच मोजतो. चेहऱ्यावर हसू आणत )

तुझंही लग्न आहे, लक्षात ठेवं! नाही, तुला आणि तुझ्या बायकोला वेगवेगळया हॉटेलात झोपायला लावलं ना...

**१**

चला, येऊ का!

(मिठी मारतो.)

रहावलं नाही, तुझी फर्स्ट नाईट आणि आपण नाही विश करायला! कॉंग्रेटस! हॅप्पी फॉर यू! बाय आनंदी! चला रे! अपनी कॉम का नाम रोशन कर बेटा!

**३**

मदत लागली तर फोन कर रे!!

**१**

शाळेत सेक्स एज्युकेशनच्या लेक्चरला बसला होतास ना? मग काय! शेटे सरांनी काय सांगीतलं आठवतंय ना?

सगळे निघून जातात. राहुल हसत हसत दार लावतो.

**CUT TO...**

**47.INT/NIGHT/ OFFICE**

निशांत निघालाय. लाईट बंद करतो. मागे वळून पहातो, आदीती एकटीच थांबलीय.

**निशांत**

(लाईट पुन्हा लावतो.)

काय गं? निघूयात?

**आदीती**

तू हो पुढे!

**निशांत**

काय झालंय! तू दिवसभर काळजीत आहेस! एवढा विचार करु नकोस! मस्त वीकेंड आलाय आराम कर! रिलॅक्स हो!

**आदीती**

निशांत आपण हनिमूनला जाऊया?

**निशांत**

(प्रश्नार्थक)

(समजून)

यांच्या? काय वेडी आहेस तू?

**आदीती**

मला इसं इंटयूशन लेव्हलला वाटतंय की आपण तिथे असावं, त्यांच्या जवळपास! या चार दिवसात फिजीकली, मेंटली ते टयून झाले तर आपले निम्मे प्रॉब्लेम्स संपतील! आपलीही ट्रीप होईल! वीकेंड रिलॅक्स!

**निशांत**

तुझा हेतू मला पटतोय पण आयडिआ पटत नाहीये असा प्रॉब्लेम आहे.

**आदीती**

प्लीज माझ्यावर विश्वास ठेव! माझं इंटयूशन कधीच चुकत नाही! मला माहीतेय तिथे आपण असलं पाहीजे. आणि आपण तिथे असणार आहोत. तसाही विकेंड आहे आणि पूर्वा प्रफुल्ल बघतील एखाद दिवस!

**निशांत**

(डोळे मिटतो. उघडतो.)

चल निघूया!

**आदिती**

आत्ता?

**निशांत**

घरी जायचं कपडे उचलायचे आणि सुटायचं. गाडी मी चालवतो पेट्रोल तू भर! गाडी मी थांबवतो टोल तू भर! चल!

(ती पुढे जाते. निशांत तिच्याकडे पहात)

जे मला तीन महि न्यात जमलं नाही, ते या दोघांनी दोन दिवसात जमवून आणलं! आदीती ही ट्रीप फार महत्वाची आहे, त्यांच्यासाठीही आणि आपल्यासाठीही!

**CUT TO...**

**48.INT/ NIGHT /HOTEL LOBBY**

**आनंदी**

(वैतागलीये)

मला वाटलंच होतं!

(शांत होते.)

आपल्यासाठीच केलंय पण काय आहे हे? आँ काय आहे हे? आरशाला लिप्स्टीक? ही ही पंधरा कॉंडम्सची पाकीटं! काय जनानखाना उघडायचाय? ही मासिकं! कांकांचा तंबू, अस्वले गुरुजींची ट्रीप वगैरे लिहीलंय यावर! आणि हे चॉकलेट सिरप,

**राहुल**

अगं ते माझी फँटसी...

**आनंदी**

काय?

(तो गप्प)

हा कमरेला लावायचा बाम!

(बसते. काहीतरी जाणवतं)

अरे अरे

**राहुल**

बघ मी म्हणलं होतं ना, गरज पडते अगं!

( ती चिडून उठते. बेडशीट काढते.)

पापड? अरे अरे अरे! अरे माणसं आहेत का कोण आहेत? एकतर हे वापिलींपी आहेत किंवा तू!

**राहुल**

(आश्चर्याने)

तुला वापीलिंपी शब्द माहीतीये? कमाल!

**आनंदी**

मी जोकच्या मूड मध्ये नाहीये. तुला सांगता येत नाही, की मित्र येणारेत!

**राहुल**

(शांतपणे)

दार उघडल्यावर सरप्राईज म्हणाले ते ! याचा अर्थ कुणालाही माहीत नाही अशी गोष्ट! मी जस्ट सांगीतलं, माझ्यावर उचकू नकोस प्लीज.

**आनंदी**

(थांबून)

बरं झालं वेळीच त्यांना कटवलंस!

**राहुल**

मला माहीती होतं तुला पण तेच वाटतंय जे मला वाटतंय!

**आनंदी**

म्हणजे मला नाही कळालं?

**राहुल**

म्हणजे त्यांना कटवून...आपण

(खोकतो.)

**आनंदी**

(हात जोडते)

तू ना वन ट्रॅक आहेस! झोपू दे मला आता...

(उशी फेकते. ती उशी त्याच्या तोंडावर बसते.)

**CUT TO...**

**49.EXT/NIGHT/ SOMEWHERE 48A.INT/NIGHT/ROOM (OPP. P/C)**

आदीती झोपेतून दचकून उठते. इकडे तिकडे पहाते. एका दुकानाबाहेर गाडी थांबलीये. निशांत चहा पितोय. सरळ फोन घेते आणि फोन लावते.

**आदीती**

हॅलो! आनंदी? मी आदीती बोलतेय! एव्हरीथिंग इज ओकेना?

**आनंदी**

म्हणजे? इथं काय भूकंप झालाय का त्सुनामी आलीये?

(घडयाळ पहाते.)

अगं **मध्यरात्री** तू मला फोन केलायस. प्लीज ठेव! बाय.

(फोन ठेवते. राहुल कूस बदलतो.)

(आनंदीची झोप गेलीये. ती उठते. राहुल कूस बदलून तिच्याकडे पहातो.)

**राहुल**

काय झालं गं? कुणाचा फोन होता?

**आनंदी**

आदीती!

**राहुल**

एकदम कट का केलास तू?

**आनंदी**

तिच्या फर्स्ट नाईटला मी असे पहाटे पहाटे फोन करते. मग कळेल!

**राहुल**

फर्स्ट नाईट, हं...

**आनंदी**

मी दमले आहे अरे, मी काय ए सेक्शुअल नाहीये.

**राहुल**

वेडी आहेस का? तसं नव्हतं म्हणायचं मला! फक्त नीट बोलून ठेवायचा फोन एवढंच म्हणलं मी !

**आनंदी**

(त्याच्याकडे रोखून पहात)

तू शिकवणारेस मला कसं बोलायचं ते?

**राहुल**

नाही ! मी तुम्हाला काय शिकवणार मॅडम ! तुम्हाला सगळंच येत!

(कूस वळवून झोपतो. तीही दुसरीकडे पहात रहाते.)

**CUT TO...**

**50.INT/DAY/ NALU MAVSHI OFFICE**

डेस्कटॉपवर एका मुलाचे फोटो दिसतात.

**नलू ताई**

दहा मिनीटच आहेत आज. खूप गर्दी आहे. हा सुबोध साने. टेक्सासचा आहे. वय २९.चार महिन्यानी येतोय. आणि पंधरा दिवसात जाणारे. २३ गुण जुळतायत. सोन्याचा संसार कराल.

(अत्यंत आनंदाने हे सगळं पहाताना मधुरा दिसते. सोबत तिचे वडील.)

**वडील**

तुम्ही दिलेल्या खडयाची प्रचिती आली बघा लगेच. मी लगेच हयाच्याशी बोलायला सांगतो.

**नलू ताई**

नाही बोललात तरी हयाच्याशीच होणार हिचं लग्न! बरं झालं त्या बर्वेंच्या उध्दट पोराशी नाही केलंस. दिसायला उजवा आहे पण जीभेच्या ऐवेजी कात्रीच बसवलीये परमेश्वरानं!

**मधुरा**

त्यांनी काहीतरी मॅट्रीमोनियल कंपनी सुरु केलीये ना!

**नलू ताई**

कंपनी सुरु करणं आणि कंपनी चालू ठेवणं या दोन फार वेगळया गोष्टी आहेत! बघा... एक कुत्र फिरकत नाहीये खरंतर त्यांच्याकडे...

**CUT TO...**

**51.EXT/DAY/ NISHANT AADITI OFFICE**

गर्दी जमलेली दिसते १०- १२ लोकांची. विठठल समोर येतो.

**विठठल**

कोण पाहीजे?

**१**

नाव रजिस्टर करायचं होतं.

**विठठल**

काका वय बघा!

**१**

माझ्या मुलाचं!!

**विठ्ठल**

हे सगळे रजिस्ट्रेशनला आलेत! बाबो!

कुलूप उघडतो. त्याचा आवाज ऐकू येतो.

**विठ्ठल**

च्यायला, पहिल्या जोडप्याचा हनिमून व्हायच्या आत गर्दी सुरु?

**CUT TO...**

**52.EXT/DAY/ GREEN SURROUNDING**

एक हात वर उचलला जातो

(अजून वर उचलतोय आपल्याला दिसतं की त्याला सूर्य हातावर ठेवून फोटो काढतात तसा काढायचाय. आनंदी क्लिक करते.)

**राहुल**

आला? आला? आता एक टिचकी मारताना... तू इकडून मार मी तिकडून मारतो.

**आनंदी**

आणि फोटो कोण काढणार? सूर्य? गप रे, मला नाही आवडत असा सूर्य बिर्य हातात धरुन फोटा काढायला.

**राहुल**

मी काढतो. दे कॅमेरा.

(कॅमेरा हातात घेतो.)

स्माईल!!

(तिचे दोन तीन फोटो काढतो. हे लांबून पहाताना निशांत आणि आदीती दिसतात. दोघे एकमेकांकडे पहातात. आणि आदीती सुटकेचा निश्वास सोडते. दोघं तिथून निघून जातात. पुन्हा आनंदी दिसते.)

**आनंदी**

फोटो काढ तू.. फक्त फेसबुक वर वगैरे टाकू नकोस! असली चीपगिरी नाही आवडत मला. प्रायवसी वगैरे काय आहे का नाही?

**राहुल**

समजा मी झाडांचे, बीच चे, इतर लोकांचे फोटो काढले तर काही प्रॉब्लेम?

**आनंदी**

तू त्यांच्याबरोबर हनिमूनला आलायस का माझ्याबरोबर?

**राहुल**

आनंदी, स्माईल!

(एक फोटो काढतो.)

मी तुला एक सांगू, लग्नानंतर तू एकदम बायको असल्यासारखी नको वागूस! आय सी यू अॅज अ फ्रेंड! बी ओपन! बी मॅड! अशी बंधन नको घालूस! आपण मजा करायला आलोय आणि हे दिवस परत कधी येणार नाहीत. जरी माझा प्लॅन दरवर्षी हनिमूनला यायचा असला तरी!

**आनंदी**

काय?

**राहुल**

प्लॅनिंग रेडी आहे. दरवर्षी ॲनिव्हसरीच्या पुढे मागे चार दिवस काढून जायचं. दोघंच. एकदा बाईकवर राजस्थान, एक्दा कार नी शिमला, एकदा ट्रेननी दिल्ली मग आग्रा, एकदा फ्लाईट नी युरोप!

**आनंदी**

नशीब चालत किंवा सायकलवर म्हणला नाहीस. तू म्हणजे जामच फिल्मी आहेस. थोडया वेळाने शाहरुखचा पिक्चर पहातेय असं वाटायला लागेल मला.

**राहुल**

ऐ... सेनोरिटा!

**आनंदी**

जायचं का आता?

**राहुल**

(नक्कल करत)

अं... पबमध्ये जायचंय... आणि नाचायचय...आं...

**आनंदी**

तू नाच... मी पहाते!

सनसेट होतो. आणि पार्टीचं म्युझिक सुरु होतं. पब दिसतो. लोकं नाचतायत.

**CUT TO...**

**53.INT/DAY/ PUB**

राहुल एका काऊंटर वरुन आनंदीसाठी ड्रिंक घेऊन येतो. टेबला शेजारुन जातो, तिथे आदिती आणि निशांत बसलेले दिसतात.

**निशांत**

सगळं व्यवस्थित आहे. तिने दोन पेग प्यायलेत. त्याने दोन पेग प्यायलेत. आता ते नाचायला जातील. मग नाचतील. मग दमतील मग दे विल हॅव फन! आपण निघूयात?

**आदीती**

एक मिनिट ! ते बघ काय चाललंय!

(समोर पहातात)

**राहुल**

(तिचा हात धरलेला)

चल ना नाचायला!

**आनंदी**

मी नाही नाचणार बिचणार, म्हणलं ना मघाशी मला नाही आवडत!!

**राहुल**

अगं एखाद दिवस दुसऱ्याच्या आवडीचं करावं. मी आईला आवडतं म्हणून आठवडयातनं दोनदा पालेभाजी खातो. ऐकना, मला आवडतं म्हणून प्लीज! चल ना

(तिला आग्रह करतोय. ती हात सोडते.)

**आनंदी**

प्लीज नको!

**राहुल**

बरं तू चल आता गपचूप नाहीतर उचलून नेईन मी!

(तिचा हात धरतो.)

**आनंदी**

तुला एकदा सांगून कळत नाही.

(झापकन हात सोडते. सगळे पहातात.)

**राहुल**

सोड! नको तर नको, पण प्लीज सीन क्रिएट करु नकोस! माझंच चुकलो तुला पब मध्ये घेऊन आलो, संभाजी बागेत घेऊन जायला पाहीजे होतं. नाचून बघ आनंदी, नाचण्यासारखी मजा नाही, सगळा स्ट्रेस सगळी इनीबिशन्स एका झटक्यात जातील बघ.

**आनंदी**

(ओरडते)

तू जा ना!

**राहुल**

(तिच्याकडे पहातो.)

बाय!

**आदीती**

आता हा निघून जाणार! भांडण डयू आहे निशांत. शीट.

(निघून जायला लागतो. लांब जातो. तेवढयात त्याच्या कानावर आनंदीच्या ओरडण्याचा आवाज पडतो. पहातो तर ती नाचायला जाते. नाचायला सुरुवात करते. बेभान होऊन नाचायला लागते. राहुल तिच्या जवळ जातो. तिचं हे रुप पाहून अवाक होतो. दोघे एकत्र नाचतायत. निशांत आणि आदितीचा जीव भांडयात पडतो.)

# PARTY SONG

**53A.INT/DAY/ PUB**

दोघं निघतात. मागे हे दोघे नाचतच आहेत. तो तिच्या कमरेत हात घालतो. ती पहाते.  तिला निशांत आणि आदिती दिसतात. ती शॉक्ड दिसतेय.

**CUT TO…**

**54.EXT/ SOMEWHERE / NIGHT**

आदीती आणि निशांत शांतपणे चांदण्यांच्या खाली बसलेत. तिच्या हातात कॉफीचा कप आहे, निशांत तिच्याकडे पहातो. ती कॉफी पिऊन कप ठेवायला जाते. निशांत तिच्याकडे पहातोच आहे.

**आदीती**

तुला हवी होती का कॉफी?

**निशांत**

नाही.

(कप हातात घेतो.)

मी या कॉफीच्या उरलेल्या भागातनं तुझं भविष्य सांगणारे.

**आदीती**

गप रे.

**निशांत**

सहा महिन्यात लग्न होणारे तुझं! निशांत बर्वे नावाच्या मुलाशी.

**आदीती**

अरे देवा! चला चला!

**निशांत**

आदीती, लग्न करशील माझ्याशी?

**आदीती**

मी अजून विचार नाही केला.

**निशांत**

मग तर लगेच हो म्हणं.

**आदीती**

सगळचं इतकं सोप्प नसतं अरे...

**निशांत**

म्हणजे तुला मी आवडत नाही? बोअर, इरीटेटिंग वाटतो? किंवा माझ्यापेक्षा आणखीन चांगला कुणीतरी मिळेल असं वाटतं?

**आदीती**

यातलं काहीच नाही. म्हणलं ना विचार नाही केला.

**निशांत**

आदीती आपण रस्त्यावरुन जाणाऱ्या सुंदर मुलीबददल सुध्दा दोन मिनिट विचार करतो, हिच्याशी लग्न झालं तर? इथं तर आपण गेले अनेक महिने एकत्र आहोत. वी आर यंग, कम्पॅटिबल, आय लाईक यू आणि मला असं वाटतं की तुला सुध्दा...

(आदीती उठते. तिथून जायला लागते.)

**निशांत**

आदीती, तुला माहीतेय, माझं वर्कपरमिट यायला वेळ होता, मग मी,

**आदीती**

हो, तू मधूराला सांगीतलंस, मग लग्न मोडलं, मग आपलं काम सुरु झालं आणि मग कळलं की वर्क परमिट डिसकंटीन्यू झालं!

**निशांत**

नाही, आपल्याला ज्या दिवशी जागा मिळाली त्याच दिवशी मला वर्कपरमिट मिळालं होतं, आणि मी गेलो असतो तर कदाचित जॉबही मिळाला असता, एका बाजूला तीन वर्षाचा सेटअप, डॉलर मधला पगार, सुपिरीअर लाईफस्टाईल, हवी तशी बायको आणि दुसऱ्या बाजूला एका मुलीशी काही दिवसांची ओळख, एक अर्धवट बिझनेस प्रपोझल, पैशाची रिस्क आणि फ्युचर अंधारात! पण मीही विचार नाही केला. डोळे बंद केले एक क्षण आणि डिसीजन घेऊन टाकला.सरळ ठरवलं आणि सांगीतलं की ते डिसकन्टीन्यू झालं. कारण मध्ये तू भेटली होतीस मला.

**आदीती**

(हेलावून जाते.)

खरंतर माझ्यावर तुझ्याइतकं प्रेम आपुलकी कुणीच आजपर्यंत दाखवली नाहीये. तरीही मला वाटत नाहीये आत्ता विचार करावा. कदाचित मी तुझ्याइतकी स्ट्रॉंग नाहीये.

**निशांत**

प्रेमात पडून बघ, नक्की होशील!

**आदीती**

आत्ता इच्छाही नाही, आणि जमणारही नाही. मी थांबते इथेच!

**निशांत**

म्हणजे तू जा?

(हलके हसतो.)

ओ के... उदया सातला निघू... गुडनाईट!

**आदीती**

गुडनाईट!

(एकटीच लांब समुद्राकडे बघत बसलीये. तो लांब निघून जातो.)

**CUT TO...**

**55.INT/ HOTEL ROOM/ NIGHT**

(रूममध्ये आनंदी बेडवर बसलेली आहे. राहुल तिच्यासमोर उभा.)

**राहुल**

काय झालंय काय?

(ती सँडल हातात घेऊनच बसलीये.)

**आनंदी**

चला निघूया उदया

(वैतागून)

काय ? कोण काही बोललं का? काही इर्मजन्सी?

**आनंदी**

डोंबलाची इर्मजन्सी! आपण उदया निघतोय. तसंही तुला इथं जे करायचं ते तिथही करुच शकतो आपण.

**राहुल**

मला म्हणजे? मी काय केल?

**आनंदी**

मी काय वाटते तुला? सगळयांसमोर अशी जबरदस्ती करतोस, वाटटेल तिथे हात लावतोस, कोण आहे मी? किती डेस्परेशन!

**राहुल**

व्हॉट द फ...

(थांबतो.)

**आनंदी**

मला नाही आवडत हे असं! आणि ते निशांत आणि आदीती का आलेत आपल्या हनिमूनला?

**राहुल**

ते आलेत? कुणी सांगीतलं?

**आनंदी**

नाटकं करु नकोस. वाट लावून टाकली सगळया हनिमूनची.

**राहुल**

(तिच्या खांदयावर हात ठेवत)

सॉरी तुला असं काही वाटलं असलं तर... मी फक्त तुझ्या चांगल्यासाठी फोर्स केला होता...

**आनंदी**

प्लीज डोन्ट टच मी!

(तो ऑफेन्ड होतो.)

आणि मला कळतं, माझं चांगलं कशात आहे ते! यू स्टे आऊट ऑफ इट! आणि प्लीज जरा बाहेर जा! मला कपडे बदलायचेत.

**राहुल**

काय?

(राहुल तिच्याकडे पहात रहातो. प्रचंड चिडलाय.)

**राहुल**

ओ के! आय विल स्टे आऊट ऑफ युवर एव्हरीथिंग! तू आणि तुझं आयुष्य! उदया सकाळी सात वाजता मी परत चाललोय. यायचं असेल तर ये, यायचं नसेल तर कधीही ये, येऊ नको, गोंधळ घाल! आणि इथं आल्यापासनं तू सीता आणि मी रावण असल्यासारखं वागणं चाललंय ना ते बंद कर आधी!

**आनंदी**

वाटटेल ते बोलतोयस तू!

**राहुल**

स्पष्ट बोलणाऱ्यानी स्पष्ट बोललेलं ऐकायचीही तयारी ठेवायची!

(बॅग उचलतो. जायला निघतो.)

**आनंदी**

(गडबडून)

तू तू कुठे चाललायस?

**राहुल**

तुला काय वाटलं तुला एकटीलाच सेल्फ रिस्पेक्ट आहे!

धाडकन दार लावून निघून जातो. ती पहात रहाते, डोळयात पाणी येतं. कपाळाला हात लावते. आपण रागाच्या भरात एकदम बोललो हे लक्षात येतं.

**CUT TO...**

**56.EXT/ CORRIDOOR/ NIGHT**

राहुल CORRIDOOR मधून चालत जाताना एका वेटरला धक्का लागतो पण त्याचं लक्ष नाहीये तो अस्वस्थपणे चालत जातो.

**CUT TO...**

**57.INT/ HOTEL ROOM/ NIGHT**

आनंदी खिडकीतून बाहेर बघताना.

**CUT TO...**

**58.EXT/SOMEWHERE / NIGHT**

अदिती निशांत तिला एकटीला सोडून गेलाय त्या जागी एकटीच विचारात उभी. तिच्या हातात कॉफ्फी मग आहे.

**CUT TO...**

**59.INT/ HOTEL ROOM/ NIGHT**

निशांत त्याची BAG भरतोय रूममध्ये पण त्याचं अजिबात लक्ष नाहीये. BAG मध्ये अदितीचा फोटो आहे तो हातात घेवून पाहत राहतो.

**CUT TO...**

**60.EXT/ HOTEL PARKING/DAY**

राहुल सगळ समान गाडीत टाकतो. आणि DRIVER च्या जवळच्या सिटवर बसतो. गाडी जाताना दिसते. आनंदी पाटीमागच्या सिटवर आहे पण हे दोघ एकमेकांशी बोलत नाहीत. हे जाणवत.

**61. EXT/ OFFICE / NIGHT**

गाडीचे लाईटस लागतात. निशांत गाडी चालवत पुढे येतो. आदीती थांबवते आणि गाडीत बसते.

**आदीती**

नाटकाला जाऊयात? ९.३० ला आहे गंधर्वला!

**मागून आवाज येतो**

आज अवघड आहे.

(वळून पहाते मागे विठ्ठल बसलेला.)

**विठ्ठल**

गाडी पक्चंर झाली. दादा म्हणले, चल सोडतो तुला. म्हणलं ओके डिलक्स! आईला फोन केला म्हणलं शेवभाजी कर. आणि आता तुम्ही जोडीनं येणार म्हणजे तर नाय का दिवाळीच!

(आदीती हसते.)

**विठ्ठल**

तुम्ही आलात तर माझ्या आईला जरा कॉन्फीडन्स येईल!

**आदीती**

चला! तू इथं काय काम करतोस असं सांगितलंयस?

**विठ्ठलः**

असिस्टंट रिलेशनशिप मॅनेजर!

(निशांत आणि आदीती हसतात. गाडी निघते.)

**आदीती**

व्हेरी गुड! रिलेशनशिप म्हणजे काय हो असिस्टंट रिलेशनशिप मॅनेजर?

**62. INT/ CAR/ NIGHT**

**विठ्ठल**

आमच्या संत्याला तर पाचवीपर्यंत रिलेशनशिप नावाचं मोठ्ठं जहाज असतं असं वाटायचं. रिलेशनशिप म्हणजे आपलं वाटणं, बास! एखादी गोष्ट, माणूस, जागा आपल्याला आपली वाटते तेव्हा रिलेशनशिप सुरु होते. पण नुसतं प्रेमात पडणं आणि ॲक्चुल रिलेशनशिप हे दोन्ही डिफरंट आहे.

**निशांत**

हो? मग आत्ता झालंय ते प्रेम का रिलेशनशिप?

**विठ्ठल**

रिलेशनशिप! अहो फिल्मचं तिकीट काढताना पिंकीला पाहीलं, आत जाताना हसलो, इंटरवलला पॉपकॉर्न घेऊन दिलं अन मग फिल्म नंतर मीच घरी सोडलं. मौके का फायदा! सर अहो, पोरी आणि बसेस आजकाल कोणासाठीही थांबत नाहीत.

**आदीती**

(चक्रावून)

बर! तुझी बस दिसायला कशी आहे?

**विठ्ठल**

खरं सांगू का? थोडी जाड आहे, नकटी आहे, आणि बुटकी पण आहे. पण मी तरी कुठं रितीक रोशन आहे? पण तिच्याबरोबर मला आपलं वाटतं... आम्ही खूप बोलतो. आमचं सगळं प्लॅनिंग रेडी आहे.

**निशांत**

(खोकतो.)

अरे व्वा! सांग की मग आम्हाला तरी...

**विठ्ठल**

सर तुम्ही किल्ली नाही ना मारते?

आदीती हसायला लागते.

**विठ्ठल**

तुमचं सांगा की! तुम्ही केलं का नाही प्लॅनिंग?

गाडी डावीकडे वळते.

**CUT TO...**

**63.INT/ DAY/ BLACKROOM**

ब्लॅक रुम मधून बोलण्याचे आवाज येतायत.

**CUT TO...**

**64.INT/ DAY/ OFFICE**

पूर्वा एका मुलाशी बोलतेय, प्रफुल्ल एका मुलीशी, आदीती आणि निशांत एकत्र बसून दोघांशी बोलतायत.

**आदीती**

काँग्रॅच्युलेशन्स! तुमच्या दोन्ही मिटींग्स सक्सेसफुल झाल्यात! पुढच्या शनिवारी घरच्यांना भेटवूया आणि बोलूया.

**मुलगी**

नक्की! आणि हो, हयाने त्याच्या आई वडीलांना सांगीतलंय की माझे आई बाबा मूक बधिर आहेत. त्यांना काही प्रॉब्लेम नाहीये. थँक्स. स्थळ म्हणून गेल्यावर इतकी मुकी आणि बहीरी लोकं भेटलीयेत मला. त्यात तुम्ही आणि सौरभ देवासारखे भेटलात. निघू आम्ही?

**निशांत**

नक्की!

(दोघे उठून जातात. आदीती निशांत एकमेकांकडे पहातात.)

दिवस कसले पटापट जातात ना...

**आदीती**

हो?

(हसायला लागते. लूप लागतो. जोरजोरात हसायला लागते.)

**निशांत**

अगं हो  थांब!

(ती हसतेच आहे)

राहुल आणि आनंदीला फोन केलास का महिना झाला आता!

(ती तरीही हसतेच आहे.)

**65.EXT/ NIGHT/ RAHUL HOME**

आनंदी आणि राहुल कुणाला तरी बाय करतायत. गाडी गेल्याचा आवाज येतो.

**राहुल**

का बोललीस तू असं? मामीनं तुला मनावर कधी घेणार असं विचारल्यावर तुम्ही घ्यायचं सोडल्यावर असं म्हणलीस तू? हसून टाळायचं!

**आनंदी**

त्याचाच कंटाळा आलाय मला...

**राहुल**

काय झालंय? एक महिना झालाय, सगळं नीट आहे...

**आनंदी**

असं तुला वाटतंय. तू सकाळी आठ ला जातोस ते रात्री नऊ ला येतोस. त्यानंतर पण तुझा ग्रुप कट्टा प्लॅन असतातच!

**राहुल**

मी तुला इतक्यावेळा चल म्हणलं तूच येत नाहीस!

**आनंदी**

कारण मी वैतागते दिवसभर! तुझा टॉवेल उचलण्यापासून, आपली रुम आवरण्यापर्यंत सगळं करते. चहापासून, इटालियन पर्यंत सगळं मला करावं लागतं. आज महिन्यातून चौथ्यांदा पाहुणे आले जेवायला.

**राहुल**

तूच म्हणली होतीस मी हौसेनं करीन

**आनंदी**

बायको म्हणून कामवाली बाई म्हणून नाही! स्पेस नाही, प्रायवसी नाही, नेटवर बसले तरी आई मागे येऊन उभ्या रहातात, बाहेर चालले तर तीन तीन दा विचारतात. रात्री बोलतानाही आपण हळू आवाजत बोलतो का तर शेजारच्या रुममध्ये त्यांना ऐकू जाऊ नये म्हणून... नाही, मी जॉब बघणारे परत! माझा जीव गुदमरतो इथे.

**राहुल**

जॉब बघ तू... घाई काय आहे?

**आनंदी**

घाई आहे राहुल ! खूप घाई आहे, तुला नाही कळणार...

**राहुल**

तुझं ठरलंय ना, मला कधीच काहीच कळत नाही. मग झालं तर!

आनंदी पुढे निघून जाते. राहुल पहातो. समोर बाल्कनीत आई बाबा उभे आहेत. त्यांच्याकडे पहातायत. तो वर पहातो.

**~~66.INT/ DAY/ OFFCIE (RAHUL PH IN) DELETED!!!!!!!!!!!!~~**

**67.EXT/ RESTAURENT/ DAY**

(राहुल समोर बसलाय. समोर आदीती. )

**राहुल**

निशांत?

**आदीती**

खूप काम आहे आज! आनंदी का नाही आली!

**राहुल**

घरी गेलीये ती!

**आदीती**

बोला, काय हालहवाल?

**राहुल**

मला कळत नाहीये काय रिॲक्ट व्हायचं ते! माझा जीव गुदमरतोय असं म्हणणं आहे तिचं.पंधराशे स्क्वे फूट चा बंगला आहे, समोर गार्डन आहे, हीचं बोलणं ऐकलं तर एखादयाला वाटेल नाझीं कॉन्सन्ट्रेशन कॅम्पमध्ये रहातेय ही.

**आदीती**

हं! तू तिला विचारलंस का तिला वेगळं रहायचंय का?

**राहुल**

(आश्चर्याने)

का?

**आदीती**

नसलं तरी विचारुन बघं. आजकाल बऱ्यापैकी मुलींना लग्नानंतर इंडीपेंडंट रहायचं असतं, काही काहीना किचन शेअर करणं हे नवरा शेअर करण्याइतकंच भीतीदायक वाटतं. लग्नानंतर पहिल्या सहा महिन्यात आपल्या वागण्यावर, बोलण्यावर, एकमेकांवर प्रेम करण्यावर कोणाचीही बंधन असून नयेत असं वाटणं स्वाभाविकआहे. मला वाटत, एकदा विचारुन बघ तिला.

**राहुल**

कमाल! जगातल्या सगळया मुली तुझ्याइतक्या सेन्सिबल असत्या तर किती बरं झालं असतं.  थँक्स!

**आदीती**

माझं काम आहे ते... तुला कधीही काहीही वाटलं तरी फोन कर!

**राहुल**

नक्की! जातो आणि विचारतो. बघू!

**आदीती**

आणि हे कमाल तू दिवसातनं किमान किती वेळा वापरतोस रे?

(दोघेही हसतात.)

**CUT TO...**

**68.INT/ RAHUL OLD HOUSE/ NIGHT**

रेस्युमी अपलोड होताना दिसतो. आनंदी लॅपटॉपवर बसलीये. राहुल कॉफी देतो.

**आनंदी**

मला **नकोय** कॉफी.

**राहुल**

कॉफी नाहीचे. सरबत आहे. शरबते जन्नत!! पिलान के मुताबिक मैने इसमे गुंगी आने की दवा डाली है!

**आनंदी**

(खिन्नपणे हसते. कप घेते.)

**राहुल**

बर ऐक ना, ही वेबसाईट उघड ना... ९९अेकर्स. कॉम

**आनंदी**

का?

**राहुल**

उघड तर...

ती क्लिक करुन वेबसाईट उघडते.

**राहुल**

तुला जसं हवं जेवढं हव ज्या एरियात हवं ते सांग, आपण रेन्टवर घर घ्यायचंय.

(आनंदी झपकन मागे वळून पहाते.)

**आनंदी**

अरे एकदम काय?

**राहुल**

घ्यायचं ठरलंय माझं! मी तुला एकच प्रश्न विचारतो. तू या घरात १०० टक्के कम्फर्टेबल आहेस?

**आनंदी**

तशी नाही असं नाही.

**राहुल**

(थेटपणे)

हो किंवा नाही?

(दोन क्षण जातात.)

**आनंदी**

नाही! पण फक्त घरं बदललं हे खापर माझ्यावर नको यायला.

**राहुल**

नाही येणार. आई बाबांशी मी बोलतो. नवीन घरी आपण दोघंच, तिथे तू तुला हवं ते कर, वेडया सारखी वाग, गोंधळ घाल, बॅचलर लाईफ जग. मी आहे. आणि तुला सांगू? तू व्हायोलिन वाजवायला सुरु कर परत!

(त्याला मिठी मारते. दोघे पहिल्यांदा इतका वेळ मिठीत दिसतात.)

**CUT TO...**

**69.INT/ RAHUL OLD HOUSE/ DAY**

भिंतीवरुन आनंदी आणि राहुलच्या लग्नाचा फोटो निघतो.

**CUT TO**

**69A.INT/ RAHUL OLD HOUSE/ DAY**

किल्ल्यांच्या स्टँडमधून दोन किल्ल्या काढल्या जातात.

**CUT TO...**

**69B.INT/ RAHUL OLD HOUSE/ DAY**

दोन क्रोकरी सेट मधला एकसेट उचलला जातो.

**CUT TO**

**69C.INT/ RAHUL OLD HOUSE/ DAY**

राहुल आणि आनंदी खाली वाकून नमस्कार करतात. आई बाबांचे डोळे पाणावलेत. राहुल हसत त्यांना धीर देतो.

**CUT TO**

**69D.EXT/ RAHUL OLD HOUSE/ DAY**

टेम्पो घरापासून लांब लांब जाताना दिसतो.

**CUT TO**

**70.INT/ RAHUL NEW HOUSE/ DAY**

नवीन घर दिसतं. साध पण छान सजवलेलं. त्यात नवीन कॅलेंडर लावलं जातं.

**CUT TO**

**70A.INT/ RAHUL NEW HOUSE/ DAY**

कॅलेंडरवरची एक तारीख खोडली जाते. राहुल आनंदीकडे पहातो.

**CUT TO**

**70B.INT/ RAHUL NEW HOUSE/ NIGHT**

रात्री आनंदी झोपलीये. राहुल बाहेरुन दार वाजवतोय, कोणीच उघडत नाहीये. तो वैतागलाय.

**CUT TO**

**70C.INT/ RAHUL NEW HOUSE/ DAY**

कॅलंडर वर पंधरा तारीख खोडली जाते.

**CUT TO**

**70D.INT/ RAHUL NEW HOUSE/ NIGHT**

ताटावर ताट ठेवलंय ते उघडलं जातं. त्यात पोळीत भाजी मिक्स झालीये. राहुल वैतागून पहातो.

**70E.INT/ RAHUL NEW HOUSE/ DAY**

कॅलंडर वर पुन्हा दोन तारीख खोडली जाते.

CUT TO

**70F.INT/ RAHUL NEW HOUSE/ NIGHT**

राहुल रात्री उठतो तर ती बेडवर नाहीये, जाऊन पहातो तर ती बाल्कनीत उभी राहून कोणाशी तरी फोनवर बोलतेय.

**70G.INT/ RAHUL NEW HOUSE/ DAY**

कॅलंडर वर चार तारीख खोडली जाते.

CUT TO

**70H.INT/ RAHUL NEW HOUSE/ NIGHT**

टीव्हीसमोर दोघे बसलेले दिसतात. राहुल एक चॅनल लावतो. रिमोट ठेवतो. आनंदी घेते. बदलते.

तो घेतो. बदलतो. ती उठून निघून जाते. टीव्ही बंद केला जातो.

CUT TO

**70I.INT/ RAHUL NEW HOUSE/ NIGHT**

कॅलेंडर वर अठठावीस तारीख खोडली जाते.

CUT TO

**70J.INT/ RAHUL NEW HOUSE/ NIGHT**

बेडवर ती शांतपणे झोपलीये. मोबाईलवर काहीतरी करतीये. तो समोर येतो. ती त्याच्याकडे पहाते. तो दार लावून घेतो आणि बाहेर जाऊन झोपतो.

CUT TO

**71. EXT/ DAY/ROAD**

आदीती आणि निशांत एका रोडवर चालतायत. आदीतीनी आणखी फ्रेश कलर चे कपडे घातलेत.

**आदीती**

चार महिने झाले, आणि काहीच झालेलं नाहीये.

**निशांत**

मी म्हणलं होतं तुला... घाबरण्यासारखं काहीही नाहीये.

(तेवढयात समोरुन एक मधुरा येताना दिसते.)

**निशांत**

लप लप! अरे ही इथे काय करतीये...

**आदीती**

ओ, अमेरीकेचं पार्सल!

(मधुरा समोर येऊन उभी रहाते.)

**मधुरा**

हाय निशांत, कसा आहेस?

**निशांत**

बरा आहे...

**मधुरा**

शॉपिंग?

**आदीती**

(हळूच)

नाही जॉगिंग!

**मधुरा**

माझं लग्न आहे नेक्स्ट वीक मध्ये.

**आदीती**

अरेरे...आपलं हे अरेव्वा!

**मधुरा**

सुबोध! टेक्सास ला असतो. जाणार मी नेक्स्ट वीक! फन ना? आता तुझं लग्न कधी, नाहीतर लोकांची लग्न करता करता स्वतः रहाशील तसाच!

**आदीती**

तुला बहुतेक माहीत नाहीये! मी आदीती हिस वुड बी वाईफ!

(निशांत प्रचंड आश्चर्याने)

सुबोधला भेटलीयेस ना? म्हणजे पाहीलयंस ना प्रत्यक्षात ? नाहीतर दिल चाहता है मधल्या सुबोध सारखा असायचा...

(हसायला लागते. लूप लागतो.)

पाच बजे उठके योगा करना है!

(परत हसते.)

आपल्या इथले अमेरिकेत काम करणारे सॉफ्टवेअर इंजीनिअर खूप पाहीलेत मी. सगळे एकाहून एक माठ. हा फारच नशीबानी मिळाला मला.

**मधुरा**

हं, लग्न कधी करताय मग?

**आदीती**

करु पण तुला नाही ना बोलवता येणार ना! तू अमेरिकेत असशील ना? सुबोध बरोबर!

(पुन्हा हसायला लागते)

सुबोध!!

(निशांत तिला ढकलत ढकलत दुसरीकडे नेतो.)

**CUT TO...**

**72.INT/ NALU MAVSHI PARAMDHAM/ DAY**

(समोर काही भक्त गण बसलेले आहेत. नलू ताई फोनवर बोलतायत.)

**नलू ताई**

हो, ठीके ! पाठवून दया... अच्छा? ऑलरेडी तिकडे गेलेत? बरं...

(फोन ठेवतात.)

**१**

ताई, गेल्या दोन महिन्यात आपल्याकडे येणाऱ्या मुला मुलीमध्ये घट झालीये. आणि समोर मागणी वाढतच चाललीये. तुम्ही म्हणला होतात सहा महिन्याच्या वर ते टिकणार नाही, पाच महिने होत आले आता.

**नलू ताई**

तुला शंका आहे माझ्यावर रमा? त्या दोघात काहीही बरं चालू नसणारे...

**CUT TO...**

**73.EXT/ RESTAURENT/EVENING**

(निशांत आणि आदीती बसलेत. आणि समोर राहुल, शांत आहे. डोळयात पाणी.)

**राहुल**

नाही काहीच बरं नाहीये ... आम्ही नीट बोलत नाही, बोलावसं वाटतच नाही तिला, साधा टीव्हीवर पिक्चर कुठला बघायचा, भाजी कुठली करायची, बेडशीट कुठलं घालायचं हे ही ठरत नाही आमच्यात, म्हणजे आमची रोज भांडणं वगैरे नाही होत आजिबात. पण ती झाली तर बरं अशी शांतता असते. घर नवीन आहे, पण आम्हीच जुने झालोय बहुतेक फार लवकर...

**आदीती**

फ्रँकली विचारते डोन्ट फील ऑफेन्डेड! तुमच्यात सेक्शुअली काही प्रॉब्लेम?

**राहुल**

मी तिच्या जवळ गेलो की तिला मी डेस्परेट वाटतो. आणि ती स्वतःहून कधीच काहीच करत नाही. ते एकच सोड, सगळं मी इनिशीएट करतो. तिच्या बाजूने कुठल्याच बाबतीत काहीच घडत नाहीये. आत्ता सुध्दा मी तिच्या मैत्रीणींना फोन करुन घरी यायला सांगीतलंय, का तर हिला बरं वाटेल!

**आदीती**

राहुल, हे एक्स्टर्नल केअरिंग झालं, तू तिच्या मनातल बाहेर पडेल, तिचं मन रमेल, तिला मनापासून चांगलं वाटेल, आनंद मिळेल असं काही केलंयस का? काहीतरी इमोशनल प्रॉब्लेम आहे.

**राहुल**

मी प्रयत्न केलाय तसा खूप!

**आदीती**

आज शेवटचा प्रयत्न करुन बघ... असं काय आहे जे केल्याने तिला मनापासून चांगलं वाटेल?

**राहुल**

आहे...अशी एक गोष्ट आहे!

~~**74.EXT/ROAD/NIGHT deleted !!!!!!!!!!!**~~

**75.INT/RAHUL ANANDI HOME/ NIGHT**

आनंदी आणि मैत्रिणी ड्रिंक्स करतायेत आनंदीने बऱ्यापैक्की ड्रिंक्स घेतलेले आहे हे जाणवते. तिची एक मैत्रीण फोनवर बोलतेय आनंदी ते तिच्याकडे पाहतेय. ती फोनवर बोलतेय.

**मैत्रिण**

हो येते बाबा... हां, सकाळी लवकर! हां...

(फोन ठेवते.)

**आनंदी**

मला पण बाबाला फोन करायचाय!

(फोन उचलते. नंबर लावते.)

हॅलो बाबा... मी बोलत्ये! कुठे आहेस तू? आँ, कधीच येत नाही मला भेटायला...मी किती फोन करते, मी कशी आहे? फ्रस्टेटेड... चुकीच्या मुलाशी लग्न केलं ना...भोगतीये आता... फालतू आहे एकदम, फालतू... त्रास देतो... तुमच्याएवढी माझी काळजी कुणी करत नाही बाबा!

(मैत्रिणी एकमेकींकडे काळजीने पहातात.)

**आनंदी**

सतत डेस्परेट ! सतत नाक खुपसणारा, स्वतःचा काही स्टँड नाही, आणि माझ्यावर प्रेम आहे म्हणून नाही, तर लग्न मोडेल या भीतीने सगळं सहन करतो तो... मोडू? माझी तर खूप इच्छा आहे...पळून जायची...पण मी कुठेच जाऊ शकत नाही... आता हयाच्याबरोबरच रहावं लागणार! नाईलाज आहे! मी चुकले, बाबा मी चुकले!!

(धाडकन फोन फेकून देते. मैत्रिणी दचकून पहातात. मोबाईल जमीनीवर आपटतो. आणि दिसतं की त्याच शेजारी राहुल शांतपणे उभा आहे. डोळे पाण्याने पूर्ण भरलेले. हातात व्हायोलिन आहे. ते धाडकन खाली पडतं.)

**राहुल**

तू नाही, मी चुकलो. आणि बरं झालं, तू मला हयाची जाणीव करुन दिलीस.

(दोघींकडे पहातो. तिथून ताड ताड निघून जातो.)

**CUT TO...**

**76.EXT/ROAD/ NIGHT**

राहुल रस्त्यावरुन अत्यंत शांतपणे गाडी चालवत चाललाय. त्याला रडू फुटतंय. डोळे पुसायला जातो. तेवढयात मोठठा प्रकाशझोत गाडीवर येतो आणि धाडकन आवाज येतो.

**CUT TO...**

**77.INT/ HOSPITAL/ NIGHT**

निशांत आणि आदीती पळत पळत येतात. दार उघडतात. समोर त्याचे आई बाबा. त्याचे मित्र पण आहेत. त्याचे आई बाबा यांच्या गळयात पडून रडायला लागतात. एवढयात आनंदी येते. तिचा अवतार पूर्णपणे विस्कटलेला आहे.

**CUT TO...**

**78.INT/ HOSPITAL/ NIGHT**

सात आठ जण सगळे बसलेले आहेत. विठ्ठल एकेकाला कॉफी देतोय. निशांत आणि आदीती आनंदी कडे पहातायत. ती मान खाली घालते. एवढयात डॉक्टर येतात.

**डॉक्टर**

कुलकर्णी?

(निशांत उभा रहातो. त्यांच्या कडेला उभे रहातात.)

**डॉक्टर**

मला माफ करा. आय एम सॉरी... पण आम्ही त्यांना नाही वाचवू शकलो.

(अचानक वातावरण स्तब्ध होतं. सगळयांचे चेहरे दुखात बुडतात. आई धाडकन खाली बसते. आनंदीच्या डोळयातून घळाघळा पाणी वहायला लागतं. आदीतीने आनंदीला धरुन ठेवलंय.)

**डॉक्टर**

आपण त्यांचे चिरंजीव?

**निशांत**

(डोळे पुसत वर पहातो.)

म्हणजे?

**डॉक्टर**

रघुवीर कुलकर्णींचे नातेवाईकना तुम्ही?

**निशांत**

मी राहुल कुलकर्णीचा मित्र!

**डॉक्टर**

ओ! आय एम सो सॉरी! काहीतरी कन्फ्यूजन झालं! राहुल इज स्टील क्रिटीकल, ॲण्ड अन कॉन्शीअस

(निशांत दीर्घ उसासा सोडतो. भिंतीला टेकतो.)

**CUT TO...**

**79.INT/ HOSPITAL/ NIGHT**

आदीती एका दरवाज्याच्या काचेच्या होल मधून समोर पहातेय. आत निशांत आणि आनंदी आहेत.

**आनंदी**

तेव्हाच तो घरातून गेला!

(शांतता)

बाबा गेला माझा एक वर्षापूर्वी! माझ्यासाठी तो सगळं काही होता. त्यांचाशिवाय मी कशी सर्व्हाइव्ह होतेय माझं मला माहीत! मी लग्नाला तयार नव्हते. कारण मी बाहेरच आले नव्हते बाबाच्या फेज मधून! पण आई आणि मामानी फोर्स केला खूप. गेल्यानंतर एका वर्षात लग्न करायचं नाहीतर तीन वर्ष करता येत नाही म्हणे ! म्हणून केलं लग्न!

**निशांत**

तुला तोंड नव्हतं का मराठी येत नव्हतं? काय प्रॉब्लेम काय होता राहुल सारख्या माणसाला हे न सांगायचा?

**आनंदी**

त्याला काय कळणार होतं?

**निशांत**

ते तू न सांगता ठरवलंस? तुझ्या आयुष्यात बाबाची जागा दुसरं कोणी घेऊ शकत नाही वगैरे ठीक आहे पण तुला माहीतेय तू काय केलंयस? तू एका सव्वीस सत्तावीस वर्षाच्या मुलाला मरायला भाग पाडलंस! तू एका चांगल्या नवऱ्याचं मॅरीड लाईफ उध्वस्त केलंस! तू एका पर फेक्ट मुलाला, त्याच्या आई वडलांना सोडायला लावलंस, सतत मजा करणाऱ्या राहुलला पोक्त, एकलकोंडा बनवलंस! त्याचं काही बरंवाईट झालं तर माझ्या दृष्टीने ती फक्त तुझी आणि तुझीच रिस्पॉन्सिबीलीटी आहे कारण या रिलेशनशिपला आणि या माणसाला दोघांनाही क्रिटीकल अवस्थेत तू टाकलंयस!

**आनंदी**

(रडायला लागते.)

आय एम सॉरी!

**निशांत**

खूप सोप्प आहे हे बोलणं. फक्त तुझं हे सॉरी ऐकायला तो वाचला पाहीजे!

**CUT TO...**

**80.INT/ NALU MAVSHI PARAMDHAM/DAY**

**नलू ताई**

(फोनवर)

वाचणं अवघड आहे! चंद्र वाईट होता ना! सहा महिन्याच्या आत होणारच होतं हे! पाचव्या महिन्यात झालं!

**CUT TO...**

**81.INT/ HOSPITAL/ DAY**

राहुल झोपलेलाच आहे. आनंदी आत येते. त्याच्या जवळ जाऊन बसते. समोर निशांत उभा आहे.

**आनंदी**

राहुल आय एम सॉरी. आय एम सो सॉरी...

**राहुल**

मला हिच्याशी नाही बोलायचं. तू प्लीज बाहेर जा.

**निशांत**

एकदा ऐकून घे तिला काय म्हणायचंय...

**राहुल**

तिचं ऐकूनच झालंय हे... आईबाबांना सांगीतलंय ऑफीसमधून येताना पडलो. तूही तेच सांग आणि शक्यतो परत येऊ नकोस.

(आनंदी उठून निघून जाते.)

**CUT TO...**

**MONTAGES**

**82.EXT/ RAHUL NEW HOUSE/ DAY**

आनंदी एकटीच नव्या घरी आहे. सगळया बाटल्या आणि बाकीच्या गोष्टी उचलते. समोर त्यानी आणलेलं गि फ्ट दिसतं. ते उचलून बाजूला ठेउन देते.

**CUT TO...**

**83.INT/ RAHUL OLD HOUSE/ DAY**

राहुल जुन्या घरी गाडीतून खाली उतरतो. स्टीकच्या आधाराने चालतोय. आनंदी त्याला आधार दयायला पुढे येते. तो नको म्हणतो.

**CUT TO...**

**83A.INT/ RAHUL OLD HOUSE/ DAY**

आदीतीचे त्याला आणि त्याचे आदीतीला मेसेजेस येताना दिसतात. त्याला बरं वाटतंय.

**CUT TO...**

**83B.INT/ RAHUL OLD HOUSE/ DAY**

राहुल शर्ट घालायचा प्रयत्न करतोय. आनंदी मदत करायला जातेय. तो धुडकावून लावतो. शर्ट वर खाली घालतो. ती नीट करुन देते.

**83C.INT/ RAHUL OLD HOUSE/ DAY**

आनंदी घरातून कुठे तरी चाललीये. तो तिच्याकडे पाहत राहतो.

**CUT TO...**

**84.INT/ RAHUL OLD HOUSE/DAY**

टीव्हीवर दोन कार्टून एकमेकांना मारताना दिसतात. समोर आदीती बसलेय. टीव्हीसमोर राहुल.

**आदीती**

काय ठरलंय?

**राहुल**

कोणाचं आमचं? माझं ठरलंय!

**आदीती**

हे लग्न टिकलं पाहीजे!

**राहुल**

हे लग्न तुमच्यासाठी इम्पॉर्टंट असेल, माझ्यासाठी नाही!

**आदीती**

का पण? सगळं एवढं व्यवस्थित आहे!

**राहुल**

ॲक्सीडेंट झाला म्हणून व्यवस्थित झालं, झाला नसता तर तिला काही फरक पडला नसता, माझा जीव स्टेक ला लावून आलेलं हे शहाणपण ओसरायला आजीबात वेळ लागणार नाही. तीचं माझ्यावर प्रेम नाहीये, आणि प्रेम म्हणजे काय एखादी कला नाहीये. प्रॅक्टीस करुन करुन जमायला! लीव्ह इट! सॉरी, तुमच्या संस्थेचं पहिलंच लग्न तुटणार!

**आदीती**

एवढा निगेटीव्ह का झालायस तू?

**राहुल**

पॉझिटीव्ह राहून कही होत नाही आदीती... कळुन चुकलंय मला! ती जाणारे आता आईकडेच! आपण भेटत राहूयात पण. कारण मला तुला भेटून खूप बरं वाटतं. भेटशील ना?

**CUT TO...**

**85.EXT/ OUTSIDE OFFICE/ DAY**

**निशांत**

(कुलूप लावत)

मग तू काय म्हणालीस?

**आदीती**

मी काय बोलणार? बाहेर पडले तेव्हा रडूच आलं मला! डिव्होर्स घेणारेत ते.

**निशांत**

घेऊ दे.

**आदीती**

अरे?? घेऊ दे म्हणजे? एवढा निवांत कसा आहेस तू? तुला काहीच वाटतं नाही? आणि नलू ताईला सांगीतलेलं ते?

**निशांत**

मला तिच प्रेशर नाही आणि माफी मागायची, त्यात काही कमीपणाचंही वाटत नाही. चुकले ते आणि आपणही. बीग डिल!

**आदीती**

अच्छा म्हणजे तू हात टेकलेत ऑलरेडी.

**निशांत**

दुसरं मी काय करणारे? हे राहुल आणि आनंदी काय राष्ट्रपती आहेत का हयांच एवढं प्रेशर घ्यायला? सगळं हयांच्याभोवती चाललंय आपलं. झालं तुटलं लग्न ! मग?

**आदीती**

मग म्हणजे? तुझ्यासाठी एक लग्न असेल माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे! उदया म्हणशील बंदही करुन टाकू त्यात काय?

**निशांत**

मी बंद करु असं म्हणलं नाही..

**आदीती**

इनडायरेक्टली...पण म्हणलास. तू म्हणलास ते खरं आहे, सगळया गोष्टी तुझ्यासाठी फार सहज असतात. लग्न जमल सहज, मोडलं सहज, हे हे सुरु केलं सहज, संपणार सहज...तुला काही फरक पडतच नसणारे...मला कळायला हवं होतं हे!

**निशांत**

(डोळे मिटतो. उघडतो.)

ओ के! थांबू आपण. तुझं सगळं ऐकलंय मी आजपर्यंत! हे ही ऐकतो. थांबूयात!

**आदीती**

म्हणजे?

निशांत काहीही न बोलता निघून जातो.

**CUT TO…**

**SAD SONG / MONTAGE:**

**86.INT / RAHUL OLD HOUSE / DAY**

आनंदी बॅग वगैरे आवरुन घराबाहेर पडते.

**CUT TO…**

**86A.INT / COFFEE SHOP / DAY**

आदीतीला फोन येतो ती बघते राहुलचा आहे. ती उचलत नाही.

**CUT TO…**

**86B.INT / NISHANT HOUSE / DAY**

निशांत कॅलिग्राफी करतोय. त्याला काही सुचत नाहीये.

**CUT TO…**

**86C.INT / TALJAI MANDIR / DAY**

आनंदी मंदिरात आहे.

**86D.INT / OFFICE / DAY**

निशांत आणि अदिती ऑफिसमध्ये काम करतायेत तेवढ्यात लाईट जाते. LAPTOP च्या उजेडात दोघे.

**CUT TO…**

**86E.INT / RAHUL NEW HOUSE / DAY**

आनंदी बाल्कनीत तंद्रीत उभी.

**CUT TO…**

**86F.INT / TALJAI TAPRI / DAY**

राहुल त्याच्या मित्रांबरोबर टपरीवर उभा पण त्याचं कुठेचं लक्ष नाही.

**CUT TO...**

**86G.INT / TALJAI / DAY**

निशांत एका बाकड्यावर अस्वस्थपणे बसलाय.

**CUT TO...**

**86H.INT / AIDITI HOUSE / NIGHT**

आदीती शांतपणे उभी आहे. आजोबा तिच्या डोक्यावर हात ठेवतात. ती त्यांच्या गळयात पडते.

**CUT TO...**

**86I.INT / OFFICE / DAY**

विठ्ठल लोकांना उत्तरं देऊन देऊन वैतागतात.

कुलूप लावून बाहेर पडतात. नलू ताई ते पहातात आणि खूश होतात.

**CUT TO...**

**86J.INT / RAHUL OLD HOUSE / NIGHT**

राहुल आनंदीला मेसेज करतो. उदया शेवटचं भेटूयात, तुझ्या काही वस्तू आहेत त्या दयायच्यात.

**CUT TO...**

**86K.INT / AIDITI HOUSE / NIGHT**

आदीतीला मेसेज येतो निशांतचा. काही फॉर्मॅलिटी आहे, उदया संध्याकाळी ऑफीसवर भेटू.

**CUT TO...**

**86L. SHUBHAVIVAH OFFICE/ EXT/ NIGHT**

पाऊस पडतोय निशांत कडे छत्री आहे अदिती उभी आहे निशांत छत्री बंद करून अदितीला देण्यासाठी विठ्ठल कडे देतो. स्वतः पावसात भिजत जातो.

**CUT TO...**

**86M.INT / CAFE SHOP/ DAY**

निशांत एकटाच उभा आहे.

**CUT TO…**

**86N.EXT / NISHANT HOUSE/ DAY**

निशांत मन रमवण्यासाठी गवत कापतोय पण त्याचे लक्ष नाही.

**CUT TO…**

**86O.INT / NISHANT HOUSE/ NIGHT**

निशांत खिडकीतून बाहेर बघत उभा आहे अस्वस्थ मागून आई येवून बघते.

**CUT TO…**

**86P.INT / NISHANT HOUSE/ DAY**

किचनमध्ये आई बाहेर बघत उभी आहे. निशांत येतो आणि तिला मिठी मारतो.

**CUT TO…**

**87. EXT/ OFFICE ROAD/ DAY**

(पूर्वा आणि प्रफुल्ल त्याच्याकडे खिन्नपणे पाहून हसतात.)

**पूर्वा**

नवीन कोणाची पेमेंटस घेतली नाहीयेत. अकाऊंटस क्लिअर आहेत. तुम्ही बघा एकदा.

**निशांत**

थॅंक्स! आपण भेटू कधीतरी… आणि हो, तुम्ही लग्नाचं ठरवलं का नाही?

**प्रफुल्ल**

सर, आम्ही लग्न नाही करणार!

**निशांत**

काय? ब्रेकअप?

**पूर्वा**

नाही नाही! व्ही रिअलाईज्ड की आम्ही मित्र जास्त चांगले आहोत. सहा महिन्यात आमची कॅज्युअल रिलेशनशिप आता चांगली फ्रेंडशिप झालीये. पण नवरा बायको म्हणून आमचं काहीच मॅच होणार नाही.

**प्रफुल्ल**

आणि सर! बर्डन, प्रेशर घेऊन लग्न कशाला करायचं? फक्त चांगले फ्रेंड आहोत म्हणून? वाटलं तर तेव्हा बघू. पण थँक्स सर, तुम्ही आणि आदीती मॅम मुळे हे आम्हाला कळलं तरी!

( तो दोघांना मिठी मारतो.)

दोघे निघून जातात. निशांत एकटाच उभा आहे. डोळयात पाणी येतं. तेवढयात समोरुन एक गाडी येऊन थांबते. त्यातून नलू ताई आणि तीन चार भक्त उतरतात. जाणार तेवढयात हयाच्याकडे पहातात.

**ताई**

काय बर्वे? आलात का रस्त्यावर?

(निशांत शांतपणे समोर पहातो. ताई त्याच्या दिशेनी चालत येतात. समोर उभ्या रहातात.)

**ताई**

उदया सहा महिने पूर्ण होतायत. त्यांचा डिव्होर्स होतोय आणि हे ही बंद पडतंय. कसं वाटतयं आत्ता आपल्याला?

**निशांत**

उदया येतो माफी मागायला... तेव्हा बोलू.

**ताई**

माफी तू हया पोरीबरोबर काम सुरु केलसं ना तेव्हाच मागायला हवी होती. तुला खरं तर ब्रेवरी अवार्ड दयायला पाहीजे, तिच्याबरोबर कामसुरु केलास. वैऱ्याचं सुध्दा असू नये असं नशीब आहे तिचं.

**निशांत**

काय बोलताय तुम्ही?

**ताई**

तुला माहीत नाही? अरे केवढा मोठठा दोष आहे तिच्या स्वतःच्या पत्रिकेत. काम केलं तरी वर्ष सहा महिन्याच्या वर टिकत नाही. एवढंच काय? दोनदा लग्न ठरलं होतं. दोनदा! दोन्ही मुलं गेली. म्हणून ती धजत नाही ना

लग्न  करायला. आणि इतरही कोणी धजत नाही हिला हो म्हणायला. मला तर भीतीच वाटली म्हणलं तू लग्न करतोय का काय तिच्याशी? वाचलास बाबा! जा आता परत अमेरिकेला!

**निशांत**

(प्रचंड शॉक्ड)

तुम्ही खरं सांगताय?

**ताई**

मी बोलते. आणि मी जे बोलते ते खरंच असतं.

**निशांत**

(फोन लावतो. उचलला जात नाही. तिथून निघतो.)

**CUT TO…**

**88. EXT/ DAY/ ROAD**

निशांत गाडी चालवतोय. त्याच्या डोक्यात तिने नाही म्हणल्याचे कटस जातात. गाडी तिच्या घरी पोचते.

**CUT TO…**

**89. EXT/ DAY/ ADITI HOUSE**

गाडी तिच्या घरी पोचते.

**CUT TO…**

**89A. INT/ DAY/ ADITI HOUSE**

आजोबा चष्मा काढतात.

**आजोबा**

खरं आहे हे. माझ्या पोरीनं गेली सहा वर्ष कशी काढलीयेत आमचं आम्हाला माहीत. त्या दोन गोष्टींनी तिचं नशीब आणि आयुष्य दोन्ही बदललं. एवढी बेधडकहोती, पण मग छोटया छोटया गोष्टींना घाबरायला लागली, त्रास करुन घ्यायला लागली. सतत बचावाच्या पवित्र्यात रहायची. कधी कधी तर आपल्याबरोबर कधी काय वाईट होईल याची नुसती वाट बघत बसायची. तिला बघून पसंत करणाऱ्या दोघांना हे सागीतल्यावर तेही पळाले. तेव्हापासून या घरात तिच्या लग्नाचा विषय झाला नाहीये.

निशांत आदीतीला फोन लावतो.

**निशांत**

आदीती... कुठायस तू? तू तिथेच थांब, मला लगेच तुला भेटायचंय! मी? तुझ्या घरी!

**90. EXT/ RESETAURENT/ NIGHT**

टेबलवर एक पिशवी ठेवली जाते.

**राहुल**

तुझ्या वस्तू. चार्जर, फोटो फ्रेम, कपडे, आणि अजून बरच काय काय आहे.

**आनंदी**

काही घेणारेस?

**राहुल**

नाही मी निघतोय लगेच. बाय.

(थांबतो.)

मी तुला फक्त एवढंच सांगायला आलो होतो, की आयुष्यात मी स्वतःपेक्षा जास्त महत्व इतरांना दिलं, प्रत्येक जवळच्या माणसाचं, मित्राचं मन राखलं, आणि त्यातून खूप मस्त वाटलं मला. आपल्यापलिकडे **पण ना** एक जग असतं आनंदी, आणि हे जेवढया लवकर तुला कळेल तेवढं बरं होईल. कधीतरी दुसऱ्याला चांगलं वाटेल, दुसऱ्याला बरं वाटेल असं काहीतरी करुन बघ!! पहिलं तुला स्वतःला बरं वाटेल!

(उठतो.)

फार बोलत नाही, मला जमत नाही आणि सवयही नाही... बाय!

(उठून वळतो. निघून जायला लागतो. आनंदीची हाक ऐकू येते. राहुल. मागे वळून पहातो. आनंदीने हातात व्हायोलिन घेतलंय. वाजवायला सुरुवात करते. डोळे मिटते. वाजवत रहाते. राहुल पहात रहातो. ती बेभान होऊन वाजवायला लागलीये. त्याच्या डोळयात पाणी येतं. तो तिच्या जवळ चालत येतो.)

**91. INT/ OFFICE/ NIGHT**

पूर्ण अंधार आहे.

**निशांत**

मला माहीतेय तू इथंच आहेस आदीती. आणि मला हे ही कळलंय की तू मला का नाही म्हणत होतीस... आपलं जे काय व्हायचंय ते होईल, पण मनातून पहिल्यांदा ही भीती काढून टाक. ऐकतेयस का?

**आदीती**

हं.

**निशांत**

माझ्याशीच असं नाही, कोणाशीही लग्न करायचा विचार कर आता प्लीज! तुला होणारा त्रास, तुझी घुसमट आणि त्यातून आलेलं हे घाबरणं, डिफेन्सिव्ह असणं मी समजू शकतो. पण, इटस हाय टाईम! आता तुझं, तुलाच हे कळलं पाहीजे, या अंधारातनं बाहेर पडलं पाहीजे. मी आहे तुझ्या सोबत. चल बाहेर जाऊयात!

(निशांतच्या गळयात पडल्याचा आणि आदीतीच्या रडण्याचा आवाज येतो. दार उघडलं जातं. आणि अंधारातून दोघांच्या आकृत्या उजेडात येताना दिसतात.)

**CUT TO...**

**92. EXT/ OFFICE/ DAY**

(ऑफीसमध्ये सगळे बसलेले दिसतात. आजोबा पण आहेत. नलू ताई भक्त गण आणि एक दोन पत्रकार ऑफीसच्या बाहेर येतात.)

**नलू ताई**

सहा महिने झाले आज बरोब्बर. आणि हयांचं ऑफीस बंद पडलंय! हयांचं पहिलंच लग्न मोडलं आहे. आणि आता त्यांनी माझी बोलल्याप्रमाणे माफी मागायचीये. या बाहेर या...तोंड लपवू नका. या ना!

निशांत बाहेर येतो, मागून आदीती पूर्वा प्रफुल्ल विठ्ठल, आनंदी राहुल येतात.

**नलू**

चला, पहिले कोण माफी मागतंय?

**निशांत**

आज फॉर अ चेंज तुम्ही मागा! कारण हे वेगळे होत नाहीयेत, आणि मी आणि आदीती ऑफीसही बंद करत नाही आहोत.

**ताई**

शक्यच नाही! खोटं आहे हे!

**विठ्ठल**

तुम्हाला शिवाजीनगर कोर्ट माहीतेय का? स्टॅंपपेपर घेऊन या, मी लिहून देतो!

**नलू ताई**

हे सगळं, आता मला दाखवायला! अरे काल पर्यंत सगळं बंद पडलेलं अचानक ग्रह बदलले?

**आनंदी**

ग्रह नाही माणसांची मनं बदलली, पत्रिकान बघताही सगळे गुणदोष लक्षात आले, संकट म्हणजे जास्तीत जास्त काय होऊ शकतं हे कळालं, आणि योग आणि योगायोग सगळयाची भिती गेली. जिथं भिती संपली तिथं तुम्ही संपलात!

**नलू**

वाटटेल ते बोलू नकोस! माझी विदया खोटी ठरुच शकत नाही!

(आजोबा बाहेर येतात.)

**आजोबा**

तरीच म्हणलं आवाज ओळखीचा वाटतोय!

(सगळे अवाकहोतात. नलू ताई चमकते.)

काय नलूताई दिक्षीत? तू काय सांगतेस विदयेबददल? मलाही ऐकू दे! माझ्याकडे आली तेव्हा पत्रिकेत चौकानाच्या ऐवेजी षटकोण काढला होता बरकां हिने!

(पुढे येतात.)

माझ्याकडनं सगळं शिकली आणि नलीची परमपूज्य नलूताई दिक्षीत झाली. परमपूज्य पदवी तर काय आजकाल होलसेल मध्ये मिळते.

**ताई**

तुम्ही आणि या चार दिवटयांनी मला नावं ठेऊन काही होणार नाही. मी आयुष्य वेचलंय त्यासाठी, हे सगळं स्वतः उभं केलंय कष्टानी कळलं ना ! वयाचा मान राखतीये, नाहीत माझ्या भक्तांनी काय केलं असतं हे सांगायची गरज नाही.

**आजोबा**

जन्मचं घोळात गेला तुझा नले. एक म्हणजे तू ज्योतिष विदयेसाठी आयुष्य वेचलं नाहीयेस आणि दुसरं हया मुलांचा ज्योतिष शास्त्राला विरोध नाहीये. भविष्याचा नावाखाली लोकांना घाबरुन पैसे काढणाऱ्यांचा, तुझ्यासारख्या स्वतःलाच देव मानणाऱ्याचा त्यांना प्रॉब्लेम आहे. नले, पैसे देऊन भक्त मिळतात, भक्ती नाही! आणि काळ पुढे गेलाय, लग्नात पत्रिका बघायच्या आधी खूप काही बघायला लागतं, हेच ही मुलं सांगतात. त्यात काय चुकीचं आहे?

**निशांत**

ए वढा अपमान पुरेसा आहे का अजून होलसेल मध्ये हवाय?

**नलू ताई**

(ओरडून)

बास, बास झालं हे!!

**आजोबा**

डोन्ट रेज यूअर व्हॉईस! इम्प्रूव्ह युअर ॲग्युमेंट!

(सगळे टाळया वाजवतात.  ताई तणतणत निघून जायला लागतात.)

**आदीती**

थांबा ताई, आपला हिशोब राहीलाय.

(ताई दचकून वळतात)

खूप वर्षांपूर्वी माझी पत्रिका बघून तुम्ही मला ते सांगीतलत, जे आजोबांना कधीच सांगायचं नव्हतं. त्या दिवसापासून मी तुमच्या समोर यायला घाबरते आणि आज मला ती भीती कायमची काढून टाकायचीये. तुम्ही म्हणलात तशी दोन मुलं आली, आणि गेली, माझ्यामुळे का नाही माहीत नाही पण गेली, मग निशांत आला, मनापासून आवडला, पण रोज थांबवायचे स्वतःला, माझ्यामुळे कोणाच्याही जीवाचं बरवाईट व्हायची एक टक्का जरी रिस्कअसेल तरी ती नव्हती घ्यायची मला.

(ताई प्रश्नार्थक)

सगळयांना वाटेल ज्या मुलीनं स्वतःच्या पत्रिकेत दोष आहे म्हणून लग्न केलं नाही, ती इतरांना का अक्कल शिकवतेय? पण प्रामाणिकपणे सांगते, की पत्रिका न बघता एक लग्न सक्सेसफुल करुन दाखवणं माझ्या आयुष्याचं ध्येय होतं, म्हणून हयांच्या एवढी मागे लागले, निशांतशी भांडले. कदाचित अशी दोन चार लग्न लावली तर स्वतःबददलही कॉन्फीडन्स येईल असं वाटत होतं. सगळयात महत्वाचं म्हणजे इथे आलेले सगळे हे आपणहून पत्रिका न बघणारे असेच होते. हयांचं लग्न टिकलं असतं तर माझा कॉन्फिडन्स टिकला असता, लग्न करायची कुठेतरी एक इच्छा होती ती टिकली असती. आणि ती एकाच माणसामुळे टिकलीय. निशांत समोर ये...

(त्याचा हात धरुन समोर आणते.)

लग्न करशील माझ्याशी?

(सगळे अवाक होतात)

हा प्रश्न रोज विचारायचे तुला मनातल्या मनात, पण आज पहिल्यांदा प्रत्यक्षात विचारतेय... आणि हो ठरवायला वेळ मागीतलास तर मिळणार नाही!

(निशांत तिला पहातो. दोघे कडकडून मिठी मारतात. ताई चिडून निघून जातात. सगळे आनंदाने ओरडायला लागतात. हसत हसत आत जातात. विठ्ठल एकटा बाहेर उभा आहे. पिंकी येते. तिच्याकडे बघून हसतो. दोघं आत जातात. )

# **THE END**